POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-११६ ● मुंबई, शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## तोतया आयएएस महिलेचे पाक कनेक्शन

### तोतया अधिकारी कल्पना भागवत ५ स्टारमध्ये राहायला

## अफगाणी प्रियकर, १९ कोटींचा चेक, पैसा आला कुठून?

**कल्पना भागवत तिचे पोलिसा तपासादरम्यान समोर आलेले कारणामे**

- सदरील महिला ही जयपूर दिल्लीला सातत्याने गेल्याचे समोर आलं आहे.
- ती दिल्लीच्या पावर मिनिस्ट्रीमध्येही अनेकांना भेटली. गृह विभागातही अनेकांना भेटल्याचा तिचा दावा आहे.
- ज्यांना व्हिजा मिळत नाही त्यांना व्हीजा मिळून देण्याचं ती आश्वासन देते.
- मोठ्या बदल्याचं काम करण्याचं आश्वासन देखील ती देते.
- पुण्यातील एका माजी कुलगुरूचं ही बेस्ट आयएस अधिकारी, सामाजिक काम असल्याचे सर्टिफिकेट तिच्याकडे आहे. तिने ते बनवलं का खरोखर दिल याचा पोलीस तपास करत आहेत.
- लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये ती राहत होती. तिचा मित्र अफगाणचा आहे, तो तिच्यापेक्षा दहा वर्षांनी लहान आहे.
- सदरील मित्राची आई आणि भाऊ पाकिस्तानमध्ये राहतो या अनुषंगाने पोलीस तपास करत आहेत.
- महाराष्ट्रातील अनेक नेत्यांना भेटल्याचा तिचा दावा आहे.
- प्रति दिवस सात हजार रुपये भाडं असलेल्या शहरातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये सहा महिन्यांपासून आईसोबत वास्तव्यास होती.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

छत्रपती संभाजीनगरातील जालना रोडवरील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये शहरातील एका महिलेने तब्बल सहा महिने बनावट कागदपत्रांच्या आधारे मुक्काम ठोकल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. सिडको पोलिसांनी संशयाच्या आधारे कारवाई करत हॉटेलमधील त्या महिलेच्या रूमची झडती घेतली असता महिलेच्या बॅगेत २०१७ च्या यूपीएससी निवड यादीची प्रत आढळली, ज्यात तिचे नाव ३३३ व्या क्रमांकावर होते. आधार कार्डवरही खाडाखोड केल्याचे स्पष्ट झाले.

चौकशीत तिच्या खात्यात अफगाणिस्तानातील बॉयफ्रेंड अशरफ खलील व पाकिस्तानातील त्याचा भाऊ आवेद यांच्या खात्यांतून मोठ्या रकमा आल्याचे समोर आले. दोघांचे पासपोर्ट, व्हिसा आणि भारतात येण्याच्या अजार्चे फोटोही तिच्या मोबाइलमध्ये आढळून आले आहेत. संपूर्ण प्रकरण अत्यंत संशयास्पद ठरल्याने एटीएस व आयबीकडून महिलेची कसून चौकशी सुरू आहे. या महिलेचे नाव कल्पना त्र्यंबकराव भागवत (वय ४५) ही महिला तब्बल सहा महिन्यांपासून जालना रोडवरील ॲम्बेसेडर या फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये राहात असल्याचं उघड झालं आहे.

**सात वषार्पासून सुकामेवा व्यवसायाचे कारण पुढे करून भारतात**

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, जालना रोडवरील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये बनावट कागदपत्रांसह सहा महिन्यांपासून मुक्काम ठोकणाऱ्या या ४५



वर्षीय कल्पना भागवत (रा. चिनार गार्डन, पडेगाव) या महिलेची केंद्रीय गुप्तचर यंत्रणांसह राज्य गुप्तचर विभागाकडून सध्या कसून चौकशी सुरू आहे. सात वर्षापासून सुकामेवा व्यवसायाचे कारण पुढे करून भारतात राहणाऱ्या तिच्या प्रियकराशी तिची एसएफएस शाळेच्या मैदानावर ओळख झाली होती. तेव्हा कल्पनाने लॉबिस्ट, लायजनिंगचे काम करत असल्याचे सांगून संवाद वाढवला होता.

एका पंचतारांकित हॉटेलमध्ये सहा महिन्यांपासून संशयास्पद वास्तव्य करणाऱ्या या कल्पना भागवतला पोलिसांनी शनिवारी ताब्यात घेतलं होतं. त्यावेळी केंद्रीय गुप्तचर यंत्रणांसोबत राज्य गुप्त वार्ता विभागाने मंगळवारी तिची ३ तास चौकशी केली. त्यातही तिने लायजनिंगचे काम करत असल्याची माहिती दिली आहे. त्यासाठी तिने बनावट कागदपत्रे तयार केल्याचे सांगितले आहे. बुधवारी तिची पोलिस कोठडी संपत आहे. बुधवारी दुपारी तिला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार असून वाढीव पोलिस कोठडीची मागणी केली जाईल.

**ते बँक खाते का केले बंद?**

कल्पनाने केलेल्या प्रत्येक आर्थिक व्यवहाराच्या माहिती मिळवण्यासाठी पोलिसांनी बँकेला पत्र पाठवले होते. यात ३२ लाखांच्या व्यवहाराची माहिती समोर आली आहे. मात्र, यातील एक खाते बंद झाल्याचे दिसून आले. हे कधी व का बंद झाले, याचा पोलिस तपास करत आहेत.

**प्रियकर निघाला ड्राय फ्रूटचा व्यवसायिक**

मूळ अफगाणिस्तानचा असलेला कल्पनाचा प्रियकर सात वर्षापासून देशात वास्तव्यास आहे. ड्राय फ्रूटचा व्यवसाय करत असून तो सध्या दिल्लीत वास्तव्यास आहे. त्याला भेटण्यासाठी ती कायम विमानाने दिल्लीला जात होती. दिल्लीशिवाय ती उदयपूर, जयपूरलाही सातत्याने गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.


### बिबट्यांचा धुडगूस अन् रेस्क्यू सेंटर हाऊसफुल

## वनविभागासमोर नवा पेच

**■मुंबई। प्रतिनिधी,**

सध्या राज्यातील ग्रामीण भागासह शहरी भागांत बिबट्यांचा वावर दिसत आहे. बिबट्यांनी अनेक लोकांवर हल्ला केला असून काही लोकांचे बळी देखील घेतले आहेत. त्यामुळे अनेक भागात बिबट्यांवर तोडगा काढण्याची मागणी केली जात असून वनविभागाने राज्यातील बहुतांश जिल्ह्यात पिंजरे लावून अनेक बिबट्यांना जेरबंद केलं आहे. मात्र आता पिंजऱ्यातले बिबटे सोडायचे कोठे? हा यक्षप्रश्न वनविभागापुढे उभा राहिला आहे.

गेल्या काही दिवसांपासून पुणे जिल्ह्यासह अहिल्यानर तसेच संपूर्ण राज्यात बिबट्यांनी अक्षरशः उच्छाद घातला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात काही लोकांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यातील नागरिक संतप्त झाले आहेत. बिबट्यांवर तोडगा काढण्यासाठी नागरिकांनी रास्तारोको आंदोलने देखील केले. यानंतर वनमंत्री गणेश नाईक यांनी नरभक्षक बिबट्याला किंवा एखादा बिबट्या संशयास्पद वाटला तर त्याला गोळ्या घालण्याचे आदेश दिले. तसेच राज्यात कुठे बिबटा दिसल्यास वनविभागाकडून सरसकट पिंजरे लावून बिबट्यांना जेरबंद करण्यात येत आहे. आतापर्यंत नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे या तीन जिल्ह्यांमधून सुमारे ९१ बिबटे पिंजऱ्यात कैद करण्यात आले आहेत. मात्र आता पिंजऱ्यात पकडलेल्या बिबट्यांना सोडायचे कुठे असा प्रश्न वनविभागासमोर



उभा राहिला आहे.

प्रशासनाकडून मिळालेल्या माहितुसार, बोरीवली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्यांचे पुनर्वसन केले जाते आणि या केंद्राची क्षमता २५ आहे. तर जुन्नर वनपरिक्षेत्रातील माणिकडोह बिबट निवारा केंद्रातसुद्धा क्षमतेपेक्षा जास्त बिबट्यांना ठेवण्यात आले आहे. तसेच नागपूरच्या गोरेवाडा वन्यजीव रेस्क्यू सेंटरची क्षमता २० असली तरी तिथे सध्या ३० बिबटे आहेत. नाशिकच्या टीटीसीमध्ये दहा वन्यप्राणी ठेवण्याची क्षमता आहे, मात्र तिथे १५ बिबट्यांसह ३ बछड्यांना ठेवण्यात आले आहे. तसेच उपचारासाठी एखादा जखमी बिबट्या आल्यास त्यास जागाही उपलब्ध होणार नाही, अशी स्थिती त्याठिकाणी आहे. महत्त्वाचे म्हणजे वाघांसाठी उभारलेल्या दोन्ही 'एन्क्लोझर'मध्येही बिबट्यांना ठेवण्यात आले आहे. एकंदरीत सांगायचे झाले, तर राज्यातील सर्वच रेस्क्यू सेंटर हाऊसफुल झाले आहेत. त्यामुळे आता जेरबंद बिबट्यांना कुठे ठेवणार? किंवा त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडणार का? हे पाहावे लागेल.

### मुंबईतील १४ विभागांमध्ये १५ टक्के पाणीकपात

## तानसा जलवाहिनी बदलण्याचे काम हाती



**■मुंबई। प्रतिनिधी,**

भांडुप जलशुद्धीकरण केंद्राला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी बदलण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कारणाने बुधवारी ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते गुरुवार ४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत एकूण १४ प्रशासकीय विभागांमध्ये पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात करण्यात येणार आहे. तानसा धरणातून भांडूप येथील जलशुद्धीकरण केंद्रास पाणीपुरवठा करणारी २७५० मिलीमीटर व्यासाची तानसा जलवाहिनी बदलण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने हाती घेतले आहे. जुनी जलवाहिनी काढून नवीन जलवाहिनी अंथरण्याकामी काही कामे प्रस्तावित आहेत. त्यासाठी साधारणतः २४ तासांचा कालावधी आवश्यक आहे. या कामकाजामुळे भांडूप येथील जलशुद्धीकरण केंद्रास होणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये अंदाजे १५ टक्के घट होणार आहे. ए, सी, डी, जी दक्षिण, जी उत्तर विभाग ; पश्चिम उपनगरातील एच पूर्व, एच पश्चिम, के पश्चिम, पी दक्षिण, पी उत्तर, आर दक्षिण, आर मध्य विभाग तसेच पूर्व उपनगरातील एल आणि एस विभाग अशा एकूण १४ प्रशासकीय विभागांना होणाऱ्या पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात केली जाणार आहे.

### ५ वर्षाच्या मुलीचे अपहरण करून विक्री

## पोलिसांकडून मामा-मामीसह ६ जण अटकेत

**■ मुंबई प्रतिनिधी,**

पाच वर्षाच्या मुलीचे अपहरण करून तिची विक्री करण्याचा वाकोला येथील प्रकार उघडकीस आणून पोलिसांनी मुलीच्या मामा आणि मामीसह सहा जणांना अटक केली. सुटका केलेल्या मुलीला सुखरूप तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आले आहे.





२२ नोव्हेंबरला मध्यरात्री या मुलीचे अपहरण झाले होते. त्याबाबतचा गुन्हा दाखल होताच परिमंडळ आठमधील गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सात पथके स्थापन करून मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली. चौकशीत एक रिक्षा मुलीच्या अपहरणानंतर संशयास्पदरित्या पनवेल येथे जाऊन परत आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. अधिक तपासात २१ नोव्हेंबरला रात्री दोन ते तीन वाजण्याच्या सुमारास एक महिला, एक पुरुष आणि रिक्षाचालक अशा तिघांनी मुलीचे अपहरण केल्याची माहिती पोलिसांच्या हाती आली. त्या आरोपींसोबत टेहळणी करण्यासाठी एक बाईकस्वार तसेच आणखी दोन आरोपी होते, असेही उघडकीस आले.

सीसीटीव्ही फूटेजमध्ये त्या रिक्षाचा क्रमांकही पोलिसांच्या हाती आला. त्यामुळे सांताक्रूझ येथील वाकोला परिसरातून रिक्षाचालक लतीफ अब्दुल माजिद शेख याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने मुलीचे अपहरण करणारे मुलीचा मामा लॉरेन्स फर्नांडिस आणि मामी मंगल जाधव असल्याचे उघड केले. हे दाम्पत्य मजुरीचे काम करते. त्या मुलीला आपण पनवेल येथे सोडल्याचे रिक्षाचालकाने सांगितले. त्यावरून पोलिसांनी पनवेल येथील विठ्ठलवाडी परिसरातून मामा आणि मामीला ताब्यात घेतले. त्या दोघांनी आपण ती मुलगी करण सणस याला ९० हजार रुपायांना विकल्याची कबुली दिली.

पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे रायगड येथील उसर्ली बुद्रुक येथून करण सणस याला ताब्यात घेतले. त्याने मुलीला वृंदा चव्हाण आणि अंजली कोपरगावकर यांना एक लाख ८० हजारांना विकल्याची कबुली दिली. वृंदा चव्हाण हिचा शोध घेतला असता, पनवेल येथील तिच्या घरात मुलगी सापडली. तिची सुटका करून मुलीला तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.



पालघर नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कैलास म्हात्रे व इतर उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, वनमंत्री तथा पालकमंत्री गणेश नाईक, खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार स्नेहा दुबे-पंडित, आमदार राजन नाईक, आमदार हरिश्चंद्र भोये, पालघर जिल्हाध्यक्ष भरत राजपूत,वसई-विरार जिल्हाध्यक्ष प्रज्ञा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## वाढवण बंदरातील रोजगारात भूमिपुत्रांना प्राधान्य

**■पालघर। प्रतिनिधी,**

पालघर जिल्ह्यातील मासेमारी करणारे मच्छीमार बांधव आणि स्थानिक भूमिपुत्र यांच्यावर कोणतीही गदा येऊ नये, या बाबीचा विचार करूनच वाढवण बंदराचे काम सुरू करण्यात आले होते. तसेच तेथील रोजगाराच्या संधीत सुद्धा स्थानिक भूमिपुत्रांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. पालघर येथे नगरपरिषद निवडणुक उमेदवारांच्या प्रचारार्थ बुधवारी आयोजित सभेत ते बोलत होते. पालघर जिल्ह्यात नवीन प्रकल्पाची विविध कामे हाती घेतली आहेत. विकसित जिल्हा म्हणून या जिल्ह्याची नवी ओळख तयार होत आहे. असे मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. पंतप्रधानांच्या विकासाचा संदेश घेऊन आपण विकासाची वाटचाल करण्याकरिता येथे आलो असल्याचे यावेळी मुख्यमंत्र्यांनी यांनी स्पष्ट केले.

## पुणेकरांना नाहक त्रास देणाऱ्या कोयता गँगला पडदा लावून धू-धू धुतलं, नागरिकांसमोर कडक कारवाई

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुणे पोलिसांच्या एका कारवाईचं सध्या सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. त्याचं कारण म्हणजे सामान्य पुणेकरांना आणि दिवसाढवळ्या आणि रात्रीसुद्धा छळणाऱ्या, नाहक त्रास देणाऱ्या गुंडांवर पोलिसांनी आता जबरदस्त कारवाई केली आहे. ही कारवाई थेट नागरिकांसमोर केली आहे. या कारवाईचा व्हिडिओही सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. फुरसुंगी-आदर्श नगर परिसरात वाहनांची तोडफोड करून दहशत माजवणाऱ्या कोयता गँगच्या सदस्यांवर पुणे पोलिसांनी अक्षरशः धडक कारवाई केली. नागरिकांच्या घराबाहेर उभी असलेली तब्बल २० ते २५ वाहने फोडून या टोळक्याने शनिवारी उशिरा रात्री परिसरात भीतीचं वातावरण निर्माण केलं होतं. मात्र घटनेनंतर काही तासांतच पोलिसांनी आरोपींना जेरबंद करत सर्वांसमोर उदाहरण घालून दिलं.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी हातात धारदार कोयते



घेऊन घोषणा देत गाड्या, रिक्षा आणि इतर वाहनांची बेछूट तोडफोड करताना स्पष्ट दिसत होते. हीच दहशत नागरिकांसमोर निर्माण झाली असताना, पोलिसांनी पकडलेल्या आरोपींना नेमकं त्याच ठिकाणी आणून कठोर शिक्षा दिली. टायरमध्ये घालून, गुडघ्यावर चालायला लावून आणि बेल्टने चोप देत पोलिसांनी या गुंडांची धिंड काढली. 'आवाज येतोय का... ?' अशा शब्दांत पोलिसांना दिलेला कडक संदेश परिसरात घुमला.

फुरसुंगी-आदर्श नगर भागात मागील काही दिवसांपासून वाढणाऱ्या गुंडगिरीला थोपवण्यासाठी ही कारवाई निर्णायक ठरली. सार्वजनिक ठिकाणीच केलेल्या शिक्षा कारवाईचा उद्देश गुंडांना मानसिक रोख लावण्याचा होता, असा पोलिसांचा स्पष्ट संदेश आहे. पुण्यात कोणत्याही प्रकारची हुल्लडबाजी किंवा दहशत सहन केली जाणार नाही, हे दाखवून देण्यासाठीच आरोपींना नागरिकांसमोर फिरवण्यात आलं. सिनिअर पीआय अमोल मोरे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

या घटनेनंतर दहशतीत असलेल्या रहिवाशांनी सुटकेचा निश्वास टाकला असून पोलिसांच्या तत्परतेचं जोरदार कौतुक होत आहे. रात्रीच्या वेळी अचानक झालेल्या तोडफोडीनं घाबरलेल्या नागरिकांना पोलिसांच्या या धडक कारवाईनं मोठा दिलासा दिला आहे. पुण्यात गुंडगिरीला पायबंद घालण्यासाठी अशा कारवाया गरजेच्या असल्याचं नागरिकांचं मत आहे.

## मध्य रेल्वेला तंत्रज्ञानाचा झटका... बनावट एसी पाससाठी चक्क एआयचा वापर

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मध्य रेल्वेच्या एसी लोकल ट्रेनमध्ये तिकीट तपासणी दरम्यान एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका महिला प्रवाशाने एआयच्या मदतीने तयार केलेला बनावट एसी सीझन पास वापरला. तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी महिला आणि तिच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या निमित्ताने अक तंत्रज्ञानाचा वापर करून रेल्वेची कशी फसवणूक केली जाऊ शकते, हे समोर आले आहे. त्यामुळे अशाच पद्धतीने रेल्वेची फसवणूक होत असावी, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

कल्याण ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान धावणाऱ्या एसी लोकल ट्रेनमध्ये २६ नोव्हेंबर रोजी सकाळी सव्वा दहा वाजता ही घटना घडली. मध्य रेल्वेच्या एका टीसीने (तिकीट परीक्षक) त्यांच्या पोलीस तक्रारीत नमूद केले आहे की, ते सकाळी १०:०२ वाजता कल्याणहून सुटणाऱ्या एसी लोकल ट्रेनच्या मधल्या डब्यात तिकीट तपासत होते. तिकीट मागितल्यावर एका महिला प्रवाशाने तिच्या मोबाईल फोनवर सीझन पास दाखवला. मात्र, पास यूटीएस ॲपऐवजी गुगल क्रोम वेबसाइटवर उघडा होता. टीसीला संशय आल्यावर त्याने क्यूआर कोड पाहण्यासाठी पास खाली स्क्रोल केला, परंतु तो गायब झाला.

टीसीने तत्काळ मध्य रेल्वेच्या हेल्पलाइन क्रमांक ५५५३३ वर संपर्क साधला आणि पासवरील यूटीएस क्रमांक पडताळून पाहिला. पडताळणीत तो यूटीएस क्रमांक एका पुरुष प्रवाशाच्या नावावर होता आणि जानेवारी २०२५ मध्ये त्याची मुदत संपली होती. सीएसटीकडून मिळालेल्या डेटाबेस तपशीलांवरूनही महिलेने दाखवलेला पास पूर्णपणे बनावट असल्याचे उघड झाले. हा मोठा घोटाळा असल्याचे टीसीच्या लक्षात आले.

यानंतर महिला प्रवाशाला डोंबिवली रेल्वे स्टेशनवर उतरवून आरपीएफ कार्यालयात नेण्यात आले. चौकशीदरम्यान, हा बनावट सीझन पास पतीने तिला वापरायला दिल्याचे सांगितले. कोडिंग कौशल्य असलेले तिचे पती इंजिनीअर असून, चौकशीत त्याने धक्कादायक माहिती दिली. त्याने चॅटजीपीटी एआय वापरून रेल्वेच्या एसी गाडीचा सीझन पास तयार केल्याचे कबुल केले. त्यानंतर महिलेला आणि तिच्या पतीला कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यात नेण्यात आले. अंबरनाथला (पूर्व) राहणाऱ्या या पती-पत्नीविरोधात भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डेटिंग ॲपवर ओळख, तरूणाला लुटून तरूणी पसार

**■भाईंदर। प्रतिनिधी,**

इंटरनेटच्या जगात हल्ली दोन व्यक्तींना एकमेकांशी संपर्क करणे सहज शक्य झाले आहे.त्यात आजकाल निरनिराळ्या डेटिंग ॲपवर मुला-मुलींची ओळख होत आहे.या ओळखीतून पुढे एकमेकांना भेटायला पण बोलावले जाते.त्यानंतर फसवणूक होण्याचे प्रकार वाढले आहे. अशीच एक घटना काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे.विशेष म्हणजे,दोन दिवसांपूर्वी मांडवी पोलीस ठाण्यात सुद्धा अशाच प्रकारचा फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. तक्रारदार तरूणाची एका तरूणीसोबत डेटिंग ॲपवर ओळख झाली होती. त्यातून ते पार्टी करण्याचे ठरवून लॉजवर गेले.

तक्रारदार हा दारू प्यायल्यानंतर तरूणीने एक तोळा वजनाची सोन्याची चैन, २० हजार किमतीचा मोबाईल, पॉवर बँक आणि इअरफोन घेऊन ती फरार झाली. या प्रकरणी काशिमिरा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर अश्याच प्रकारचा गुन्हा दोन दिवसांपूर्वी मांडवी पोलीस ठाण्यात सुद्धा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात सुद्धा आरोपीचे नाव आताच्या तक्रारीप्रमाणेच आहे. दोन्ही प्रकरणात मिळून तीन तोळे सोने, दोन मोबाईल आणि एक घड्याळ असे मिळून तीन लाखांच्या आसपासचा ऐवज लंपास केला आहे.

याप्रकरणी काशीमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार विजय गंभीरराव हे तपास करत आहेत.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## अपघाताला संशयाचं वलय!



संयुक्त अरब अमिरातीच्या (यूएई) दुबईत झालेल्या एअर शोमध्ये हवाई कसरती करताना शुक्रवार २१ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय हवाई दलाचं लाइट कॉम्बॅट एअरक्राफ्ट (एलसीए) तेजस लढाऊ विमान जमिनीवर कोसळलं. या दुर्दैवी अपघातामध्ये पायलट विंग कमांडर नमांश स्याल यांचा जागीच मृत्यू झाला. एका आंतरराष्ट्रीय प्लॅटफॉर्मवर एलसीए-तेजसला झालेला हा अपघात भारताच्या 'मेक इन इंडिया' आणि 'मेक फॉर द वर्ल्ड' धोरणाला मोठा धक्का देणारा ठरलाय. कारण या अपघातामुळं अनेक प्रश्न उपस्थित झालेत. हा अपघात मानवी चुकीमुळं अर्थात पायलटच्या चुकीमुळं घडला? विमानातील तांत्रिक बिघाडामुळं तेजस खाली कोसळलं की तेजस कुठल्या घातपाताचं बळी ठरलंय? दुबईच्या अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळावर होणारा दुबई एअर शो हा जगातला एक मोठा एअर शो मानला जातो. जगभरातल्या विमान उत्पादक कंपन्या या एअर शोमध्ये दरवर्षी सहभागी होतात. यंदा १७ ते २१ नोव्हेंबर २०२५ दरम्यान हा शो आयोजित करण्यात आला होता. यात ११५ देशांतील १५०० अधिक एक्झिबिटर्स व संरक्षण उत्पादक कंपन्या आदी सहभागी झाले होते. मिलिटरी, जनरल एव्हिएशन, बिझनेस जेट, कार्गो, कमर्शियल, हेलिकॉप्टर अशा विविध श्रेणीतील २०० हून अधिक विमानं इथं आणण्यात आली होती. यामध्ये एअरबस, बोईंग, बॉम्बार्डियर, अमिराती एअरलाइन्स, एम्ब्रर आदी मोठ्या कंपन्यांच्या जनरल एव्हिएशन विमानांसोबतच ए ४०० एम, केसी ३९०, सी १७ ग्लोबमास्टर, युरोफायटर टायफून, जे एफ १७, राफेल, एस यू ५७ ई, एफ-१५ इगल, बी ५२ बॉम्बर आदी लढाऊ विमानांचाही सहभाग होता. भारतीय वायू दलाचं सूर्यकिरण आणि तेजस मार्क १ चं पथक या एअर शोमध्ये कसरती करण्यास सज्ज होतं. त्यानुसार या पथकांनी हवेत चित्तथरारक कसरती करून प्रेक्षकांचं मन तर जिंकलंच पण; त्याचसोबत जागतिक विमान कंपन्यांचही लक्ष वेधून घेतलं. खासकरून तेजसनं आपली पूर्ण क्षमता या एअर शोमध्ये दाखवून दिली. एअर शोच्या अखेरच्या दिवशी शुक्रवारी तेजसला सोलो डिस्प्ले (एक एअरक्राप्ट, एक पायलट) कसरतीसाठी वेळ देण्यात आला होता. अनुभवी विंग कमांडर नमांश स्याल तेजसचं सारथ्य करत होते. सुरुवातीची ५ मिनिटं नमांश स्याल यांनी टेक्स्ट बुक लेव्हल मन्युव्हर केलं, परफेक्ट प्रिसिशन, फोटो फिनिश लूप्स केले, रोल्स केले, हाय स्पीड पासेस केले, जमिनीजवळून वेगानं उडणाऱ्या कसरती केल्या. सगळं काही परफेक्ट होतं. स्थानिक वेळेनुसार दुपारी २:१० वाजता नमांश स्याय यांनी लो-लेव्हल रोल विथ नेगेटिव्ह जी फोर्स या सर्वात कठीण मन्युव्हरला सुरुवात केली. त्यानुसार जमिनीकडून आकाशाच्या दिशेनं तोंड करून 'पूल अप मन्युव्हर' करत तेजसनं लूपचा अर्थात कसरतीचा पहिला टप्पा पूर्ण केला. उंचीवर पोहोचून तेजसनं त्याच वेगानं जमिनीकडं उलट्या दिशेनं वाटचाल केली. जमिनीच्या अगदी काही फुटांवर येऊन पाठ सरळ करून पुन्हा आकाशाच्या दिशेनं झेपावण्याच्या आतच नमांश स्याल यांचं तेजस स्थानिक वेळेनुसार दुपारी २:१० वाजता जमिनीवर कोसळून दुसऱ्याच क्षणी आगीच्या लोळात रूपांतरीत झालं. डोळ्याची पापणी लवण्याच्या आत झालेल्या अपघातात स्याल यांना विमानातून बाहेर पडण्यासाठीही वेळ मिळाला नाही अन् भारतानं आपला अनुभवी पायलट गमावला. क्रॅशचा व्हिडीओ बघताना असं लक्षात येतं की नमांश स्याल शेवटच्या क्षणापर्यंत विमानाला कंट्रोल करण्याचा प्रयत्न करत होते. कारण त्यांनी आधीच इजेक्ट केलं असतं तर विमान प्रेक्षक गॅलरी किंवा विमानतळावर उभ्या विमानांवरही कोसळण्याची शक्यता होती. परंतु, तसं झालं नाही. म्हणूनच लढाऊ विमानाच्या नुकसानीपेक्षा भारतासाठी अनुभवी पायलट गमावण्याचं दुःख मोठं आहे. हा अपघात होईपर्यंत लहान आकाराच्या सिंगल इंजिनच्या तेजसनं आपल्या दीड पट मोठ्या आकाराच्या लढाऊ विमानांना टक्कर दिली होती. भारतानं मेक इन इंडियाच्या धर्तीवर विकसित केलेलं तेजस मार्क १ ए विमान दुबई एअर शोमध्ये अनेकांच्या असूयेचं कारणंही बनलं होतं. त्यामुळंच हा शो सुरू होताच तेजसबाबत अनेक अफवा उठवण्यात आल्या होत्या. खासकरून पाकिस्तानी आणि चिनी फेक हँडलर्सनी सोशल मीडियावर तेजसचे अनेक एडिटेड फोटो टाकून विमानतळावर उभ्या तेजसमधून ऑईल लिक होत असल्याच्या बातम्या पेरल्या होत्या. अमेरिका आणि युरोपातील विमान कंपन्याही या फेक न्यूजवर पोळ्या शेकत होते. त्यामुळं या अपघातामागं कुठला घातपात तर नाही ना असाही संशय व्यक्त होतोय. ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतीय सैन्य दलांनी पाकिस्तानची दाणादाण उडवली होती. त्यात स्वदेशी शस्त्रास्त्रांचा मोठा वाटा होता. ब्रम्होस मिसाईल, आकाशतीर संरक्षण प्रणाली आणि एस यू ३० एमकेआय, राफेल, तेजस लढाऊ विमानांनी भारतीय संरक्षणसिद्धता दाखवून दिली होती. डिफेन्स इंडस्ट्री ही जगात सर्वात मोठी इंडस्ट्री मानली जाते. भारतासारखा विकसनशील देश विकसित देशांसोबत स्पर्धा करतो, विकसित देशांच्या तोडीची किंबहुना त्यापेक्षाही सरस शस्त्र उत्पादनं बनवतो आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे भारतीय शस्त्रांना मागणीही मिळते ही बाब अनेक देशांच्या पोटदुखीचं कारण बनलीय. स्वदेशी तेजसच्या बाबतीतही हेच म्हणावं लागेल. ऑपरेशन सिंदूरवेळी जेएफ १७ नं भारताचं राफेल विमान पाडल्याच्या वावड्या पाकिस्तान आणि चीननं उठवल्या होत्या. सद्यस्थितीत चीनच्या जेएफ १७ लढाऊ विमानाला आंतरराष्ट्रीय बाजारात कुणी विचारत नाही. त्यामुळं राफेल पाडल्याच्या खोट्या नॅरेटिव्हमधून तरी जेएफ १७ ला ग्राहक मिळेल असं चीनला वाटत होतं, मात्र अजून तरी त्यांची झोळी रिकामीच आहे. दुसरीकडं अर्मेनिया भारताच्या हिंदुस्थान एअरोनॉटिक्स लि. सोबत १२ तेजस विकत घेण्यासाठी १.२ अब्ज डॉलरचा करार करण्याच्या तयारीत आहे. परंतु, या अपघातामुळं विमानाची सुरक्षा आणि तांत्रिक तपासणी पूर्ण होईपर्यंत अर्मेनियानं या कराराच्या वाटाघाटी थांबवण्याचा निर्णय घेतल्याचं म्हटलं जातंय. अर्थात, भारत किंवा अर्मेनियाकडून अद्याप अधिकृत सांगण्यात आलेलं नाही. इजिप्त, अर्मेनिया आणि आग्नेय आशियाई देशांना तेजस लढाऊ विमानं विकण्यास भारत प्रयत्नशील आहे. त्यातच दुबई एअर शोमधील दुर्घटनेनं या प्रयत्नांना धक्का बसल्याचं म्हटलं जातंय. तरीही, एचएएलला अपेक्षा आहे की या अपघाताचा विमान करारावर परिणाम होणार नाही, कारण असे अपघात एअर शोमध्ये अनेकदा होतात. अमेरिकन एफ-३५ आणि एफ-१६ सारख्या प्रगत लढाऊ विमानांनाही याआधी अपघात झाले आहेत. असे अपघात केवळ एअर शोपुरते मर्यादित नाहीत. ते कधीही केव्हाही होतात. तेव्हा कोणत्याही लढाऊ विमानाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ नये. याआधी, मार्च २०२४ मध्ये, राजस्थानच्या पोखरणमध्ये हवाई दलाच्या सरावादरम्यान जैसलमेर शहराच्या बाहेरच्या परिसरात तेजस विमान दुबईप्रमाणंच फ्री-फॉलमध्ये जमिनीवर कोसळलं होतं. या क्रॅशचा रिपोर्ट अद्याप हवाई दलानं जाहीर केलेला नाही. तेव्हा, अपघातापूर्वी पायलट विमानातून बाहेर पडल्यानं बचावला होता. सध्या, भारतीय हवाई दलात तेजसच्या 2 स्क्वॉड्रन तैनात आहेत. एक स्क्वॉड्रन तामिळनाडूमधील सुलूर एअरबेस (कोइम्बतूर) इथं तैनात आहे. तर, दुसरी पाकिस्तान सीमेजवळील एका फॉरवर्ड एअरबेसवर तैनात आहे. ऑपरेशन सिंदूरदरम्यान, एलसीए तेजसनं हवाई गस्तीमध्ये भाग घेतला होता. गेल्या महिन्यात, एलसीए तेजसची प्रगत आवृत्ती असलेल्या मार्क-१ए चं पहिलं उड्डाण नाशिकमध्ये संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत झालं होतं. २०२१ मध्ये, संरक्षण मंत्रालयानं एचएएलसोबत ८३ मार्क-१ए लढाऊ विमानांसाठी करार केला होता. तर, सप्टेंबर २०२५ मध्ये आणखी ९७ विमानांसाठी करार करण्यात आलाय. परंतु, अमेरिकेसोबत ताणलेल्या संबंधांमुळं जीई एअरोस्पेसकडून एएफ ४०४ इंजिन मिळण्यात प्रचंड उशीर होतोय. आतापर्यंत या कंपनीकडून फक्त ४ इंजिन मिळाल्यानं तेजसचं उत्पादन रखडलंय. या अपघातानंतर पुन्हा एकदा सोशल मीडियावर तेजसला आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनाम करणाऱ्या फेक नॅरेटिव्हचं पीक आलंय. तेजसचं सारथ्य करणारे विंग कमांडर नमांश स्याल यांना लढाऊ विमान उडवण्याचा दोन दशकांहून अधिकचा अनुभव होता. अनेक एअर शोमध्ये त्यांनी चित्तथरारक कसरती करून दाखवल्या आहेत. त्यामुळंच त्यांच्याकडून चूक होणं अशक्य असल्याचं त्यांच्या जोडीदारांचं म्हणणं आहे. तरीही जी फोर्समुळं त्यांच्या हातून चूक घडली का किंवा विमानात काही तांत्रिक बिघाड झाला का? याची चौकशी करण्याकरिता हवाई दलानं या अपघाताच्या कोर्ट ऑफ इन्क्वॉयरीचे आदेश दिलेत. एचएएलनंही अपघाताची चौकशी करण्यात सर्व यंत्रणा सहकार्य करत असल्याचं सांगितलंय. अनेक अडचणींवर मात करत आकाशात भरारी घेणाऱ्या तेजसभोवती एका अपघातानं संशयाचं वलय निर्माण झालंय. त्यामुळं तेजसवरील आंतरराष्ट्रीय ग्राहकांचा विश्वास टिकवून ठेवणं एचएएलसाठी यापुढच्या काळात मोठं आव्हान ठरू शकतं.

## यातून काय मिळते हे महत्त्वाचे!

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे भवितव्य आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल काय येतो यावर अवलंबून आहे. तर सध्या सुरू असलेल्या निवडणूक कार्यक्रमाच्या प्रचाराचा भर 'राज्याची सत्ता आमच्याकडे आहे आणि तिजोरीच्या चाव्याही आहेत तेव्हा मतदान करताना विचार करा', असा आहे.**



आरक्षणाचा विषय राजकारणाने गुंतागुंतीचा केल्याने सर्वोच्च न्यायालय काय निकाल द्यायचा तो देईल, पण राजकीय आघाड्या आणि युती ही खरे तर महानगर, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांची मक्तेदारी. स्थानिक समीकरणे गुंतागुंतीची असल्याने नको असलेल्यांना सत्तेबाहेर ठेवण्यासाठी मातब्बर नेतेमंडळी अचाट आणि अफाट राजकीय आघाड्या बनवत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्ता ताब्यात ठेवत. पण १९९५ नंतर राज्य पातळीवर आघाडी आणि युतीची सत्ता अपरिहार्य बनत गेली तसतसे स्थानिक निवडणुकांचा रागरंग बदलत गेला.

आज नगरपालिका, नगर पंचायत निवडणुकीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आपापसातच संघषार्ची भूमिका घेत असल्याने एक नेता म्हणतो तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे, तर दुसरा म्हणतो तिजोरीचा मालक आमच्याकडे आणि तिसरा म्हणतो नगरविकास माझ्याकडे असल्याने आवाज माझाच चालेल. आता यात विरोधी पक्षाला नेमकी भूमिका काय, हा मोठा प्रश्नच आहे. लोकांचे लक्ष वेधून घेणे ही निवडणुकीतील कला असते. आपण जेवढे चर्चेत राहू तेवढे मतदारांचे लक्ष आपल्याकडे वळते आणि त्याचा कळत-नकळत परिणाम मतदानावर होतो हा उद्देश असतो. १९९९ ते २०१४ च्या दरम्यान काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसने हाच प्रयोग केला. त्यावेळच्या प्रचारात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर ज्येष्ठ एकामेकांवर कुरघोडी करताना दिसले व तसे निकालही लागले. आताही तेच सुरू आहे.

नवे काय आहे, तर राज्याची तिजोरी. ९ लाख कोटीहून अधिक कजार्ने वाकलेल्या तिजोरीतून विकास कामांवर नेमका किती खर्च होतो याचा अभ्यास करण्यास विरोधकांना वेळ नसल्याने त्याचा लेखाजोखा समोर येण्याचे कारण नाही. बहुतेक सर्व मोठी विकासकामे कर्जातून सुरू आहेत. केंद्र सरकारच्या 'हुडको' या उपक्रमाने गेल्या काही वर्षात पायाभूत सुविधा विकासकामांसाठी किती कर्जाऊ रक्कम दिली याचा अभ्यास केला तरी पुरे आहे.

सध्या विरोधी पक्ष मतदार याद्यांतील त्रुटी शोधण्याकामी लागला आहे. तो अभ्यास संपेल तेव्हा त्यांचा प्रचार काय असेल हे ठरणार आहे. दुसऱ्या बाजूला सत्तापक्षाचा प्रचाराचा धडाका सुरू आहे. त्यांचे अनेक उमेदवार बिनविरोध निवडून येत आहेत. अधिकाधिक सदस्य निवडून आणत पालिकांसह इतर स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेणे, पुढे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषेदवर निवडून द्यावयाच्या जागांची निश्चिती करणे आणि परिषदेत विरोधकांची अवस्था विरोधी पक्षनेतेपद सुद्धा मागता येणार नाही, अशी केविलवाणी करणे असाच अजेंडा दिसून येतो आहे.

खरेतर विरोधी पक्षाला फारसे काम दिसत नाही. मतदार यादी, निवडणूक आयोग इथून सुरू झालेले त्यांचे प्रश्न आपले लोक अचानक माघार कसे घेतात आणि सत्ताधारी बिनविरोध कसे काय निवडून येतात यात गुंतत चालले आहेत. भरीस भर म्हणून मतदारांची त्यांच्याबद्दलची सहानुभूती किती काळ टिकेल हा ही प्रश्न आहे. कारण थेट रक्कम हातात देणाऱ्या अनेक योजना लोकांना भुलवून टाकत आहेत. सध्या गावोगावी भजनी मंडळांना निधीवाटप सुरू होत आहे. त्यासाठी राज्य सरकारने साडेचार कोटी रुपये मंजूर केले आहेत. भजनी मंडळातील लोक आपल्याला 'पगार' सुरू होतोय या खुशीत आहेत.

सोबत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, याची हमी सरकारकडून दिली जात आहे. १०-१२ अशाच योजना आहेत. भविष्यात काय वाढून ठेवलेय या पेक्षा महिन्याला बँक खात्यात काय जमा होतेय हे पाहणे हाच अनेकांचा प्राधान्यक्रम बनू पाहत असल्याने यापुढे सतत निवडून येण्यासाठी अशाच योजना कामी येणार. मग विरोधी पक्षाला कामच काय आहे? तसेही त्यांच्यातले अभ्यासू, ज्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकले जाते असे किती लोक सध्या सक्रीय आहेत? जे होते त्यांचा चांगलाच बंदोबस्त झाला आहे.

लोकांना जे हवेय तेच दिले जातेय. काही वर्षांपूर्वी राज्याच्या राजकारणातले एक बडे प्रस्थ असलेल्या व्यक्तीने सांगितलेला हा किस्सा महत्त्वाचा वाटावा. नागपूरच्या हिवाळी अधिवेशन काळात पश्चिम महाराष्ट्रातल्या त्या नेत्याला तिथल्या एका प्रभावशाली नेत्याने आपल्या स्थानिक की शेतघरी निमंत्रित केले. ते घर पाहून नेते अचंबित झाले. तुम्ही अशा भपकेबाज घरात राहता ते लोकांना खटकत नाही का, असा सवाल करत ते म्हणाले की आमच्या गावात असे घर बांधले तर लोक आम्हाला कायमचे घरात बसून राहण्यासाठी निवृत्त करतील. तेव्हा त्या यजमान नेत्याने दुसरा एक किस्सा पाहुण्याला ऐकवला. ते म्हणाले की, आमच्याकडे एका प्रमुख राजकीय पक्षाने सोज्वळ प्रतिमेच्या नेत्याला एका महत्त्वाच्या निवडणुकीत उमेदवारी दिली. एका प्रचारसभेत त्या नेत्याने स्वतःचे बँक पासबुक काढले व लोकांना दाखवत ते म्हणाले की पहा मी काही इतरांसारखा पैशाने मातब्बर नाही. पण निवडून आल्यास माझी बांधिलकी तुमच्याप्रती असेल. पण मतदारांत चर्चा अशी झाली म्हणे की याच्याकडे आताच काही नाही, हा पुढे तरी आपल्याला काय देणार आणि हा नेता दणकून पडला. हा किस्सा ऐकल्यावर पाहुणा नेता निःशब्द झाला.

निवडणुका महाग झाल्या ही चर्चा काही नवीन नाही. तसे का झाले हे सर्वज्ञात आहे. सरकारने निवडणूक खर्च करावा अशी मागणी केली जात होती. पण आता मतदारांसाठी थेट निधीच्या लोकप्रिय योजनांचा मारा सुरू असल्याने ती वेगळ्या अथार्ने पूर्ण झाली असे म्हणता येऊ शकते. दुरगामी परिणाम करणारी, सर्वसामान्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी किती कामे आपण केली व विकास योजनांचा निधी राज्याच्या उत्पन्नात वाढ करून मिळवलाय व काही वर्षांनंतर कर्ज काढण्याची गरजच भासणार नाही असे ठामपणे म्हणता येईल का? या चर्चेत आता कोणाला रसही दिसत नाही.

२६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणून आपण साजरा करतो. कारण या दिवशी संविधान सभेने देशाची राज्यघटना स्वीकारली. ती अर्पण करताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, राजकारणात आपण एक व्यक्ती, एक मत व एका मताचे एक मूल्य हे तत्व मानणार असू पण सामाजिक आणि आर्थिक रचनेमुळे ते नाकारणार असू.... तर याचा अर्थ आपण आपली राजकीय लोकशाही संकटात टाकत आहोत असे होईल. हे विधान सध्याच्या वातावरणात सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित होते का, याचा विचार करणारांसाठी महत्त्वाचे आहे.

एकीकडे प्रगतीचे आकडे डोळे दिपविणारे असले तरी ठराविक काही वर्षांनी मेळघाट, चिखलदरा व नंदुरबारमधील कुपोषण आणि बालमृत्युंच्या बातम्या आपला पिच्छा सोडत नाहीत. अलीकडेच ६५ बालकांचा मृत्यू झाल्याचा विषय मुंबई उच्च न्यायालयासमोर आला. त्यावर गंभीर चिंता व्यक्त झाली व काही विभागाच्या सचिवांना अमरावतीतल्या कुपोषणग्रस्त भागाचा दौरा करून तेथील परिस्थितीची पाहणी करण्याचे आदेश दिले गेले आहेत. आपण सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित करू शकलोय का, याचे उत्तर यातूनच शोधायचे आहे.

## लोकशाहीच्या माध्यमातून जिहाद ?

वक्फ म्हणजे अल्लाला दान केलेली संपत्ती! आज काँग्रेसचे सरकार राहिले असते, तर हिंदूंचा हा देश अल्लाची संपत्ती होण्याच्या दिशेने निघाला असता. दुसऱ्या शब्दात सांगायचे, तर भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश यांना जोडणारा 'इस्लामीस्तान' होण्याच्या मार्गावर झपाट्याने मार्गक्रमण करणारा असता. स्वतःची संपूर्ण कारकीर्द मुसलमानांच्या लांगूलचालनासाठी खर्चून देशाचे वाटोळे करणाऱ्या काँग्रेसच्या संदर्भातील हे वक्तव्य अतिशयोक्ती वाटू नये. याचे कारण जी जमात तिच्या धार्मिक विचारांशी एकनिष्ठ राहून त्या नियमांचे तंतोतंत पालन करते, तिला मोकळा हात दिला, तर ती 'दारुल हरब'ला (इस्लामचे राज्य नसलेल्या प्रदेशाला) 'दारुल इस्लाम' (इस्लामी अधिपत्याखाली आणणे) केल्याखेरीज रहात नाही. गेली १ सहस्र वर्षे तलवारीच्या बळावर याच विचारसरणीने या हिंदु प्रदेशाचा एक तृतीयांश भाग गिळंकृत केला. उरलीसुरली कसर 'वक्फ कायदा, १९९५'च्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी काँग्रेस पुढे सरसावली होतीही. पुढे वर्ष १९९८ मध्ये सर्वोच्च न्यायालयातील २ न्यायमूर्तींच्या खंडपिठाने 'वन्स अ वक्फ ऑल्वेज अ वक्फ', म्हणजेच इस्लामनुसार 'एखादा भूखंड वक्फ म्हणून घोषित झाला, तर तो 'कयामत'च्या दिनापर्यंत, म्हणजे विश्वाच्या अंतापर्यंत वक्फच रहाणार', असे घोषित करून टाकले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या या निरीक्षणाने या देशविरोधी कायद्याला योग्य ठरवले. खरेतर यात माननीय न्यायपालिकेला दोषीही म्हणता येणार नाही; कारण ती लोकप्रतिनिधींनी बनवलेल्या कायद्यांच्या आधारे स्वतःची निरीक्षणे नोंदवते अथवा याचिका निकाली काढते. तथापि, हे निरीक्षण पुढे सातत्याने स्वतः सर्वोच्च न्यायालय, तसेच अनेक उच्च न्यायालये यांनी वापरले आणि 'वक्फ न्यायाधिकरणा'ला समांतर न्यायव्यवस्थेचा मिळालेला दर्जा रूढ होऊन बसला.

### मुनंबम्चे प्रकरण!

नुकत्याच बनलेल्या 'वक्फ सुधारणा कायदा २०२५'नुसार आता वक्फ कायद्यात आमूलाग्र पालट झाले आहेत, हे सर्वश्रुत आहे. भारतभरातील मुसलमान संघटना, कट्टरतावादी राजकीय पक्ष आदींनी त्यास प्राणपणाने विरोध केला; परंतु केंद्रशासनाच्या कठोर आणि प्रभावशाली निर्णयक्षमतेपुढे त्यांना मान खाली घालावी लागली. अर्थात बाबरी ढाचा पाडला जाणे आणि वर्ष २०१९ मधील श्रीराममंदिर प्रकरणाविषयी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय



येणे, यांना जिथे आजही विरोध होतो तिथे त्याचा सूड घेण्यासाठी भारतात बाँबस्फोट करण्याची सिद्धता केली जाते, तिथे 'वक्फ'च्या आडून लँड जिहाद आणि भारताचे इस्लामीस्तान करण्याचे या राष्ट्रघातकी पंथियांच्या मनातील मनसुबे कधीतरी शांत बसू शकतील का? याचा सूडाग्नी 'श्रद्धावान' (?) मुसलमानांच्या मनात धगधगत नसेल, तर नवल!

एप्रिल २०२५ मध्ये वक्फ सुधारणा कायदा झाला खरा; पण आता ७ महिन्यांनी एका ७५ वर्षे जुन्या प्रकरणाच्या निमित्ताने या कायद्यावर पुन्हा आगपाखड होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. प्रकरण आहे केरळमधील कोचीजवळच्या मुनंबम् येथील ४०४.७६ एकरच्या भूमीचे! या भूखंडाची विशालता लक्षात येण्यासाठी भारतातील सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण भूखंडांशी तिची तुलना करणे क्रमप्राप्त होय. राजधानी देहलीतील 'सेंट्रल विस्ता' आणि 'रायसिना हिल' या क्षेत्रात असलेली संसद, पंतप्रधान कार्यालय, अन्य मंत्रालये, नॉर्थ ब्लॉक, साऊथ ब्लॉक या भूमीचे एकत्रित क्षेत्रफळ साधारण ४०० एकर आहे. देहली कॅन्टोनमेंट, आंधप्रदेशातील भारतीय अंतराळ संस्था 'इस्रो'चे श्रीहरिकोटा येथील उपग्रह प्रक्षेपण केंद्र, मुंबईतील जगप्रसिद्ध 'वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स', 'आयआयटी बाँबे' आदी अत्यंत महत्त्वपूर्ण स्थानांचे क्षेत्रफळ मुनंबम् येथील वादग्रस्त क्षेत्रफळाएवढे आहे. यातून या प्रकरणाची विकृत भयावहता लक्षात येते.

### 'वक्फ'चा जिहाद!

मूळ वादाचे निरीक्षण केले, तर हा वाद न्यायपालिका, म्हणजेच लोकशाहीला झुगारून देण्याचा प्रयत्न होय. वर्ष १९५० मध्ये कुणा एका मुसलमानाने मुनंबम् येथील एवढी भूमी कुणा फारूक कॉलेजला भेटस्वरूपात दिली. पुढे कॉलेजने ती स्थानिकांना विकली. जवळपास ६०० कुटुंबांनी तेथे त्यांची घरे बांधली. आता प्रत्येक घरात मूळ, म्हणजेच 'अधिकृत' घरमालकांची तिसरी अथवा चौथी पिढी श्वास घेत आहे. असे असतांना वर्ष २०१९ मध्ये एकाएकी केरळ वक्फ बोडार्ने या भूमीला वक्फच्या अधिपत्याखाली आणले आणि सर्व ६०० कुटुंबांच्या आश्रयाला 'अनधिकृत' घोषित करून टाकले. पुढे वक्फ न्यायाधिकरणामध्ये याचिका प्रविष्ट (दाखल) करण्यात आली. या प्रकरणी वर्ष २०२४ मध्ये केरळच्या साम्यवादी राज्य सरकारने आश्चर्यकारकिरत्या एक समिती नेमून ६०० कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न चालवला; परंतु वक्फ बोर्डाने त्यास घटनाबाह्य ठरवण्यासाठी उच्च न्यायालय गाठले. उच्च न्यायालयाने 'वक्फ कायदा १९९५'नुसार मूळ भूमी ही वक्फची नसल्याचाच निवार्ळा देऊन समितीची स्थापना योग्य ठरवली. त्यामुळे 'श्रद्धावान' मुसलमानांनी सर्वोच्च न्यायालय गाठले आहे. त्यांनी विशेष रजा याचिका (स्पेशल लीव्ह पिटीशन) प्रविष्ट करून समिती रहित करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी याचिकाकर्त्यांच्या मागण्या या लोकशाहीच्या तिसऱ्या स्तंभावर - न्यायपालिकेवर थेट प्रहार करतात. याचिकेत सांगण्यात आले आहे की, मूळ याचिका न्यायप्रविष्ट असतांना 'उच्च न्यायालय वादग्रस्त भूमी ही वक्फची नाही', असे म्हणू शकत नाही. येथे न्यायप्रविष्ट अर्थात वक्फ न्यायाधिकरणात याचिकेवर सुनावणी चालू आहे, असे या लोकशाहीद्रोह्यांना म्हणायचे आहे. हे संकट देशाच्या न्यायाधारित विश्वासाला तडा देणारे आहे, हे सामान्य हिंदु जनतेस लक्षात येत आहे का? यातून केरळमध्ये न्यायाच्या राज्याला एक प्रकारे इस्लामी आव्हान निर्माण होते कि नाही? अशा प्रकारे ऊठसूठ याचिका करून सर्वोच्च न्यायालयाचा वेळ वाया घालवणे, हा 'लँड जिहाद'ला अधिकृत ठरवण्याचा प्रयत्न नाही का? तांत्रिकदृष्ट्या पाहिले, तर 'वक्फ सुधारणा कायदा २०२५'च्या अन्वये या याचिकेत तसा कोणताही दम नाही. वक्फ न्यायाधिकरणाला मिळालेल्या अनियंत्रित अधिकारांवर आता टाच आणण्यात आली आहे. 'मूळ वर्ष १९९५ मधील कायद्यातील कलम ८३, ८४ आणि ८५ यांना सुधारणा कायद्यात रद्दबातल ठरवल्यामुळे आता ही याचिका फेटाळण्यात येईल', अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाकडून केली पाहिजे. याकडे एक 'लार्जर पिक्चर' (मोठे चित्र) म्हणून पाहिले, तर भारतासारख्या लोकशाहीप्रधान आणि धर्मनिरपेक्ष देशात 'वक्फ' नावाची वळवळ हवीच कशाला? वक्फ स्वरूपात पाकिस्तान, बांगलादेश गेले, ते अल्प आहे का? आता 'लोकशाही जिहाद' रूपातील हे आक्रमण कायमचे परतवून लावण्यासाठी या 'वक्फ'ला देशाबाहेर हाकला!

## श्रमेव जयते



पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी संसदेत श्रम संहितेला मंजुरी देऊन भारतातील ४० कोटी कामगारांना त्यांच्या श्रमांचा लाभ मिळवून दिला आणि प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. या सुधारणा स्वतंत्र भारतातील सर्वात मोठ्या आणि परिवर्तनकारी असल्याचे सांगण्यात येत आहेत. या नव्या सुधारणा वसाहतवादी काळातील म्हणजे कालबाह्य आणि निरूपयोगी झालेल्या ब्रिटिश राजवटीतील कामगार कायद्यांची जागा घेतील. भारताला विकसित देश बनवण्याच्या दृष्टीने या नव्या सुधारणा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. ट्रेड युनियन्स आणि डाव्या प्रणित पक्षाच्या कामगार संघटना सोडल्या, तर बहुतेक सर्वांनी या सुधारणांचे स्वागत केले आहे. कारण या सुधारणेमुळे आर्थिक लाभाबरोबरच कामागारांना सुरक्षाही देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यामुळे लिंगभेद पूर्णपणे संपुष्टात आला आहे. लिंगभेद आता संपुष्टात आल्याचे जाहिर होत असून, देशभरातील लाखो महिलांच्या दृष्टीने या सुधारणा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. एमएसएमई म्हणजे लघू, सूक्ष्म व मध्यम उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. देशातील जवळपास एक पंचमांश एमएसएमई उद्योगांचे नेतृत्व महिलांकडे आहे. या महिला उद्योजकांना अधिक सामर्थ्य व संधी देण्यासाठी या सुधारणा 'नारीशक्ती'चा खरा सन्मान करतात. या कोडमुळे महिला कामगारांची उत्पादकता वाढेल, कार्यक्षेत्रात त्यांना अधिक संधी मिळेल आणि सामाजिक न्यायाची भक्कम पायाभरणी होईल. हे या सुधारणांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. आतापर्यंत ही नियमावली अनेक क्षेत्रांत पाळली जात नसे; मात्र आता असा भेदभाव चालणार नाही. महिलांना समोर ठेवून हे कोड तयार करण्यात आले असले तरीही सर्व कामगारांना आणि देशातील कामगारशक्तीचा विचार करण्यात आला आहे. नव नियुक्तांना नियुक्तीपत्रे देण्याची तरतूद, महिलांसाठी कामाचे तास निश्चित करणे आणि वेतन वेळेवर देणे, कामावर अपघात झाला, तर त्याची पूर्ण भरपाई देणे आणि कामगार वर्गाची प्रतिष्ठा वाढवणे हा लेबर कोडचा उद्देश आहे. हे नवीन लेबर कोड का आणावे लागले मागे एक विचार आहे. तो म्हणजे जे लेबर म्हणजे कामगारविषयक कायदे होते ते सर्व कालबाह्य झाले आहेत आणि ते ब्रिटिश काळातील होते. त्यामुळे त्यामध्ये व्यापक सुधारणा करणे काळाची गरज बनली होती. या नव्या कोडचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांना आता रात्रपाळीत काम करण्याची तसेच धोकादायक व जड यंत्रसामग्री हाताळणाऱ्या क्षेत्रात, जसे की खाणकाम, अशा ठिकाणी काम करण्याची औपचारिक परवानगी देण्यात आली आहे. मात्र, यासाठी संबंधित महिलांची स्पष्ट संमती आवश्यक असेल आणि त्यांच्या सुरक्षेसाठी कडक उपाययोजना बंधनकारक असतील. यामुळे लिंगाधिष्ठित भेदभाव दूर करण्याचा ठोस प्रयत्न केला गेला आहे. तसेच तक्रार निवारण समित्यांमध्ये महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल, अशी तरतूद करण्यात आली आहे. या कोडद्वारे प्रत्येक कामगाराला सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे त्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. याशिवाय, सर्व कामगारांसाठी ईएसआयसीचे दरवाजे खुले करण्यात आले आहेत. एकच कामगार जरी धोकादायक कामात गुंतलेला असेल, तरीही त्याला ईएसआयसीचा संपूर्ण लाभ मिळणार आहे.

## केवळ १० मिनिटे टाळ्या वाजवण्याचे आरोग्यदायी फायदे

**हल्ली** आपण बागेत लोकांना जोरजोरात टाळ्या वाजवताना बघत असाल तेव्हा मनात विचारही करत असाल की खरंच टाळ्या वाजवल्याने आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडत असेल का? तर याचं उत्तर आहे होय... नियमित दररोज १० मिनिटे टाळी वाजवली तर हैराण करणारे परिणाम दिसून येतात. तर जाणून घ्या टाळी वाजवण्याचे काय परिणाम आहे ते....

- याने कॉलेस्ट्रॉल नियंत्रित राहतो.
- हृदयरोग आणि उच्च रक्तदाबा सारख्या गंभीर आजारांचा धोका दूर होतो.
- याने चरबी कमी होण्यास मदत मिळते ज्यामुळे वजन कमी होतं.
- यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते.
- रक्ताभिसरण चांगले होते.
- पचनतंत्र सुधारते ज्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या नाहीशी होते.
- याने फुफ्फुस निरोगी राहण्यास मदत मिळते.
- मानसिक ताण कमी होतो, मेंदू सक्रिय राहतं ज्यामुळे स्मरणशक्ती वाढते.
- याने शरीरात हार्मोन्स रिलीज होतात ज्यामुळे चांगली झोप लागते.
- शरीरात ऑक्सिजनचं प्रमाण वाढतं, ज्यामुळे श्वासासंबंधी आजारावर नियंत्रण राहतं.





## तेलकट त्वचेची काळजी कशी घ्याल!

- त्वचा तेलकट असल्यास क्लिन्झिंगला पर्याय नाही. क्लिन्झिंगमुळे त्वचेवर साठलेली घाण, मेकअप, मृत त्वचा नाहीसे होऊन रंध्रे मोकळी होतात. या उपायाने ब्लॅकहेड्सची समस्या दूर होते. आठवड्यातून एकदा लाईट स्क्रब केल्याने फायदा होतो.
- ऑईल फ्री फेसवॉश नियमित वापरल्यास त्वचा तेलकटमुक्त राहते. ग्लिसरीनयुक्त साबणाचा वापर करू नका.
- तांदळाच्या पिठीमध्ये पुदिन्याचा अर्क किंवा गुलाबजल मिसळून चेहऱ्यावर दहा मिनिटे हा पॅक ठेव-ावा. दहा मिनिटांनंतर हलक्या हाताने चोळून पॅक काढून टाकावा.
- पर्समध्ये नेहमी गुलाब अथवा लॅव्हेंडर बेस असलेलं स्किन टॉनिक ठेवा. त्याबरोबर वेट टिश्यूजही हवेत. दर दोन तासांनी यानं चेहरा स्वच्छ केल्यास त्वचा टवटवीत राहते.
- तेलकट त्वचेवर अँकनेचा त्रास होत असेल तर टी ट्री अँटी पिंपल जेल अथवा जेल मॉईश्चरायझर वापरणं चांगलं.
- त्वचेचं सीबम ऑईल नियंत्रणात ठेवण्यासाठी तेलकट आणि मसालेदार पदार्थ वर्ज्य केलेले चांगले. तैलीय ग्रंथीमध्ये संतुलन राखण्यासाठी फायबरयुक्त भोजन उपयुक्त आहे. दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणात एकेक डिश सॅलड असणं अतिआवश्यक आहे.



## तांदळाचे हे आहेत अनेक फायदे



**चेहऱ्यावरील डाग दूर होतात :** चेहऱ्यावरील डाग घालवण्यासाठी उपयोगी आहे तांदूळ. तांदूळ बारीक वाटून घ्या. वाटलेल्या तांदळाच्या पिठामध्ये थोडेसे पाणी मिसळून ही पेस्ट चेहऱ्यावर हलक्या हाताने लावा. यामुळे चेहऱ्यावरील डाग दूर होतात.

**डोकेदुखीसाठी फायदेशीर :** डोकेदुखीचा त्रास होत असल्यास शिजलेल्या भाताच्या पाण्यात एक चिमूट सुंठ पावडर मिसळून डोक्यावर लावा. यामुळे डोकेदुखीपासून सुटका होते.

**जुलाबाचा त्रास होतो दूर :** जुलाबाचा त्रास होत असल्यास तांदूळ बारीक वाटून घेऊन ते पाण्यात उकळवा. यात मीठ टाकून ही पेज प्या. यामुळे जुलाबाचा त्रास कमी होतो.

**सतत तहान लागणे :** सतत तहान लागत असेल तर तांदळाचे दाणे दिवसातून दोन-तीन वेळा चावून चावून खा. यामुळे तहान लागणे कमी होते.



**प्रत्येक व्यक्तीने आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. चांगल्या आरोग्यासाठी रोजचा आहार आपण काय घ्यावा? याची प्रत्येकाला माहिती असायला पाहिजे. तर निरोगी राहण्यासाठी हे १० पदार्थ कच्चे खाऊ नका.**

## हे १० पदार्थ कच्चे खाऊ नका

- **राजमा :** शिजवलेला राजमा खाल्ल्याने पोटाच्या समस्या दूर होतात.
- **काजू :** कच्चे काजू पेक्षा भाजलेले काजू चवदार आणि आरोग्यासाठी फायदेशीर असतात.
- **मांस :** मांस नेहमी स्वच्छ धुवून शिजवून खाणे आरोग्यासाठी योग्य आहे.
- **टोमॅटो :** टोमॅटो कच्चे न खाता थोडेसे शिजवून खावेत. त्याने आरोग्यावर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.
- **मूग :** मोड आलेले मूग शिजवून किंवा थोडेसे तेल टाकून भाजून खावेत. कच्चे मूग खाल्ल्याने शरीरातील रोग प्रतिकारक क्षमता कमी होते.
- **हिरव्या भाज्या :** सगळ्या हिरव्या भाज्या नेहमी स्वच्छ धुवून शिजवाव्यात किंवा थोड्याशा तेलात भाजून घेतल्याने शारीरिक समस्या होत नाहीत.
- **मशरूम :** कच्चे मशरूम शरीरासाठी धोकादायक असतात, त्यासाठी मशरूम नेहमी शिजवून घ्यावेत.
- **बदाम :** कच्च्या बदामापेक्षा भाजलेले बदाम खाण्यासाठी जास्त चवदार असतात.
- **दूध :** उकळलेलं दूध शरीरासाठी पौष्टिक असते.
- **अंडी :** चांगल्या आरोग्यासाठी अंडी उकडून खावीत.



## ॲसिडिटीचा त्रास टाळता येईल का?

कामाच्या आणि जेवणाच्याही अनियमित वेळा, धावपळीचे दैनंदिन आयुष्य, बदलती जीवनशैली, जेवणाच्या अनियमित वेळा, जागरण, बदललेले आहाराचे स्वरूप यामुळे अपचन किंवा ॲसिडिटीचा त्रास होणे हा अनेकांच्या दिनक्रमाचाच भाग बनला आहे. आम्लपित्त किंवा हायपर ॲसिडिटी होऊन छातीत जळजळणं हा सध्याच्या धावपळीच्या जीवनात जवळजवळ प्रत्येकाला छळणारा विक-ार असतो. अनेकदा रुग्ण 'ॲसिडिटी होतेय' हीच तक्रार घेऊन डॉक्टरकडे येतात.

पण या तक्रारीत खास ॲसिडिटीचा त्रास आहे की दुसरे काही आहे हे डॉक्टरला शोधून काढावे लागते. आपल्या आजूबाजूच्या अनेकांना हा त्रास होत असतो. छातीतील जळजळ प्रत्येकाने कधी ना कधी तरी अनुभवलेली असतेच असते, तर काही व्यक्तींची ती कायम सोबती असते. आपल्या आजूबाजूला कुटुंबात, शेजारीपाजारी अनेक जण यामुळे त्रस्त असतात. कुणाला जळजळतं, तर कुणाला मळमळतं, कुणाचे यामुळे डोके दुखते तर कुणाचे पोट दुखत असते. कधी खूप ढेकर येतात किंवा तोंडामध्ये कडवटपणा येतो. जळजळ होण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख कारण म्हणजे ॲसिडिटी किंवा आम्लपित्त. त्यामुळे ॲसिडिटी म्हणजे काय, हा त्रास कुणाला व का होतो, त्यावर इलाज काय, हा त्रास टाळता येईल का, याबद्दल आपण जाणून घेऊ.



ॲसिडिटी म्हणजे नेमके काय?

आपल्या पोटात म्हणजे जठरात एक पाचक रस तयार होत असतो. तो ॲसिडिक म्हणजे आम्लयुक्त असतो. आपण जेवलेल्या अन्नाच्या पचनासाठी या पाचक रसाची अत्यंत गरज असते, पण योग्य प्रमाणात. हाच पाचक रस जर जास्त प्रमाणात निर्माण झाला किंवा अवेळी (म्हणजे जेवणाच्या वेळेव्यतिरिक्त) तयार झाला तर आम्लपित्ताचा त्रास होतो. यालाच ॲसिडिटी असे म्हणतात.

### 'ॲसिडिटी' का होते?

- पोटात जास्त प्रमाणात आणि अवेळी हा 'आम्लयुक्त पाचकरस' तयार होण्याची महत्त्वाची कारणे म्हणजे worry, hurry, curry. आयुष्य हल्ली वेगवान झाले आहे.
- सकाळी न्याहरी करण्यासाठी वेळ नसतो. मग नुसताच चहा, कॉफी इ. पेये घेतली जातात. ज्यामुळे पोटातील ॲसिड किंवा आम्लपित्त वाढते व ॲसिडिटी जाणवू लागते.
- धकाधकीच्या जीवनात प्रत्येक जण विविध मानसिक ताणाखाली वावरत आहे. अभ्यास, करिअर, कार्यालयातील कामाचा तणाव, कौटुंबिक ताणतणाव इत्यादी कारणांमुळे मज्जासंस्थेवर परिणाम होत असतो आणि त्यामुळे जठररसाची निर्मिती जास्त प्रमाणात होत राहते. ॲसिडिटीची सुरुवात होते.
- भूक लागली की रस्त्यात उभे राहून वडापाव, पावभाजी, पिझ्झा, पाणीपुरी, दाबेली इत्यादी फास्टफूड खाण्याकडे कल वाढत आहे. यातून अमिबीयासिस किंवा जियारडिआसिस सारखे संसर्ग होतात आणि यामुळे देखील ॲसिडिटी (gastritis) चा त्रास होतो.

### प्रमुख कारणे

- रात्री भरपेट जेवून तत्काळ झोपणे.
- रात्री खूप उशिरा झोपणे.
- बदलीच्या नोकऱ्यांमुळे पुरेशी झोप न होणे. अपुऱ्या झोपेमुळेही ॲसिडिटी बळावते.
- मद्यपान करणे.
- अंगदुखी, सांधेदुखी, डोकेदुखी इत्यादी कारणांसाठी वेदनाशामक औषधे सातत्याने घेणे.
- आहारात अतितेलकट, तिखट, जळजळीत मसाल्याचे पदार्थ घेतल्यानेही ॲसिडिटी वाढते.
- अतिकडक उपवास किंवा उपवासाच्या पदार्थांच्या सेवनानेही ॲसिडिटीचा त्रास होतो.
- शिळे अन्न खाल्ल्याने पोटातले आम्लपित्त वाढते आणि अपचन झाल्याने ढेकर येतात.
- भुकेपेक्षा दोन घास कमी खावेत हा आयुर्वेदाने सांगितलेला मूलमंत्र लक्षात ठेवावा. भुकेपेक्षा अधिक खाल्ल्यानेही आम्लपित्त वाढते आणि आंबट ढेकर येतात.

### लक्षणे

- जळजळ, आम्लपित्त पोटाच्या वरच्या भागात किंवा छातीत जळजळ होणे ही ॲसिडिटीची मुख्य लक्षणे आहेत. काहीही तिखट किंवा तेलकट जास्त खाल्ल्यास जळजळ होते. जेव्हा जठरात किंवा आतड्यात व्रण (अल्सर) असतो, तेव्हा प्रभावी उपाययोजना करून जळजळ नाहीशी होते. जर व्रण नसेल तर त्याला वैद्यकीय भाषेत नॉन अल्सर डीस्पेप्सिया म्हणतात. म्हणजे लक्षणे तर अल्सरची आहेत, पण एण्डोस्कोपी केल्यास अल्सर नाही. अशा रुग्णांना वारंवार हा त्रास सतावतो.
- काही वेळा जेवताना किंवा जेवणानंतर जठरातील आम्ल घशात येऊन, अन्ननलिकेत जखमा होतात.
- जठरात विशिष्ट जंतूंचा संसर्ग झाल्यास ॲसिडिटी बळावते आणि अल्सर किंवा काही गाठीसुद्धा येण्याचा संभव असतो.
- हृदयविकाराचा झटका, पित्ताशयातील खडे, पित्ताशयाची सूज, स्वादुपिंड दाह इत्यादी अनेक कारणे असण्याची शक्यता असते. या दुखण्याकडे वेळीच लक्ष न दिल्यास धोकादायक ठरू शकते.

## स्पेशल पुदिना राईस

**साहित्य :** २ वाटी तांदूळ, २ वाटी पुदिन्याचे पाने निवडून व धुऊन, फोडणीसाठी तमालपत्र, जिरे, पाच ते सहा लसूण पाकळ्या, अंदाजे मीठ, लाल मिरची फोडणीसाठी.

**कृती :** पुदिना व लसूण पेस्ट बनवून घ्या. तांदळाचा मोकळा भात शिजवून थंड होऊ द्या.



पुलाव मसाला लहान १ चमचा, गरम पॅनमध्ये तेल, जिरे, तमालपत्र व मिरची घालून फोडणी द्या. त्यावर वाटलेला पुदिना घाला व परत पुलाव मसाला घाला. चांगले परतून शिजवलेला भात घाला. मीठ घाला, परतून वाफ येऊ द्या. खोबऱ्याचा किस व पुदिना पाने लावून सजवा व खायला वाढा. यामध्ये मिक्स पालक थोडी वाफवून व वाटून आपण घालू शकता.

## शाम्पूच्या वापरामुळे केसगळतीची समस्या वाढते का?

**कधीकधी अचानक केस खूप गळत असल्याचे तुमच्या लक्षात येते.केस गळण्याचे कारण शोधताना मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपणे आपण रोज केस स्वच्छ धुण्यासाठी शाम्पूचा वापर करतो. त्यामुळे आपण वापरत असलेल्या शाम्पूमुळे तर केस गळत नाहीत ना? किंवा कोणता शाम्पू आपल्या केसांसाठी योग्य असू शकतो? हे प्रश्न आपल्याला पडू शकतात.**



केस गळणे ही अनेकांना भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. मात्र केस गळण्याची कारणे प्रत्येक व्यक्तीमध्ये निरनिराळी असू शकतात. डॉ. अपूर्वा शाह यांनी त्यांच्या 'हॅव अ ग्रेट हेअर डे' या पुस्तकामध्ये शाम्पू केल्यामुळे केस गळत नाहीत किंवा तेलांमुळे केसांच्या त्वचेतील मुळे बंद होत नाहीत, असे मत मांडले आहे. त्याचप्रमाणे हेअर एक्सपर्ट जावेद हबीब यांनी देखील त्यांच्या 'हेअर योगा' या पुस्तकामध्ये शाम्पूच्या वापरामुळे केस गळत नाहीत, या सत्याचा उलगडा केला आहे.

अयोग्य शाम्पू वापरल्यामुळे मात्र तुमच्या केसांची मुळे नक्कीच कमजोर होऊ शकतात. त्यामुळे बरेच दिवस तुमचे केस गळत राहतात व केसांचे खूप नुकसान होते. यासाठी तुमच्या केसांच्या प्रकारानुसार योग्य शाम्पूचा वापर करणे गरजेचे आहे.

### योग्य शाम्पू कसा निवडाल?

तुमच्या केसांचा प्रकार ओळखून योग्य शाम्पूची निवड करा. बाजारात अनेक ब्रॅण्डचे शाम्पू उपलब्ध असले तरी त्यातून तुमच्यासाठी योग्य प्रकारच्याच शाम्पूची निवड करा. त्याचप्रमाणे दर ४ ते ५ आठवड्यांनी तुमच्या शाम्पूचा ब्रॅण्ड बदला. सतत एकाच ब्रॅण्डचा शाम्पू वापरल्यामुळे तुमच्या केसांमधील त्वचेवर त्याचा दुष्परिणाम होतो व तुम्हाला हवा तसा योग्य बदल दिसून येत नाहीत.



**योग्य शाम्पूची निवड करण्यासाठी आधी तुमच्या केसांचा प्रकार ओळखा –**

- **ऑईली हेअर –** काही दिवस केसांमधील त्वचा तेलकट असते, पण केसांची शेवटची टोके कोरडी असतात.
- **ड्राय हेअर –** केस खरखरीत असतात, जे लवकर गुंततात व कुरळे किंवा फ्रिजी असतात.
- **नॉर्मल हेअर –** केसांचा पोत अति कोरडा अथवा अति तेलकटही नसतो.
- **डॅमेज हेअर –** या केसांमध्ये कोंडा किंवा केस दुभंगण्याची (स्प्लीट एण्ड) समस्या असते.
- **लीम्प हेअर –** केस सपाट असतात, ज्यांचा व्हॉल्युम जास्त नसतो किंवा केस फुललेले नसतात.

## ॲल्युमिनियम फॉईलमध्ये पदार्थ का शिजवू नयेत?

**जर** तुम्ही दररोज जेवणासाठी ॲल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे.

नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून असे समोर आले आहे की ॲल्युमिनियम फॉईलमध्ये शिजवलेले अथवा गुंडाळलेले पदार्थ खाल्ल्याने शरीरावर परिणाम होतो.

जेव्हा ॲल्युमिनियम फॉईलमध्ये अन्न शिजवले जाते, त्यावेळी मोठ्या प्रमाणात ॲल्युमिनियम अन्नात मिसळते आणि हे अन्न खाल्ल्याने ते शरीरात जाते. यामुळे हाडांचे आजार तसेच ब्रेन सेल्सची वाढ कमी होण्याची शक्यता असते.



## आवळा सरबत प्या, हे १० आजार टाळा

**आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आवळा उत्तम आहे. आवळा सरबत घेतल्याने आपल्याला अनेक फायदे होतात. आपले आरोग्य चांगले राहते. आयुष्य वाढण्यास मदत होते. आयुर्वेदातही आवळ्याला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. आवळा सरबतात मध मिसळले तर अधिक चांगले. तसेच आवळा ज्यूसमुळे महिलांच्या पाळीची समस्या दूर होण्यास मदत होते.**



- आवळा ज्यूस आणि मध एकत्र करून प्यायल्याने दम्याचा प्रभाव कमी होतो.
- रक्त शुद्ध करण्यासाठी आवळा सरबत आणि मध खूप गुणकारी आहे.
- आवळा सरबत नियमित घेतल्यास कोलेस्ट्रॉल कमी होते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका टळण्यास मदत होते.
- आवळा खाण्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. कारण मेटाबॉलिजम व्यवस्थित होऊन वजन कमी होते.
- आवळा हा पाचक आहे. त्यामुळे पचन व्यवस्था व्यवस्थित राहते.
- आवळा सरबत प्यायल्याने चेहऱ्याला ग्लो येतो. तसेच त्वचारोग दूर होण्यास मदत होते.
- लघवीचा ज्यांना त्रास आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. सरबत प्यायल्याने लघवीसंबंधीचे आजार दूर होतात.
- ज्यांना किडनी स्टोनचा आजार आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. मूतखड्याचा आजार दूर होण्यास मदत होते.
- आवळ्यामुळे मधुमेह (Disbetes) नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- सतत तोंड येत असेल तर आवळा सरबत प्यायल्याने ही समस्या दूर होते. तसेच डोळ्यांची शक्ती वाढण्यास मदत होते.

## फोनमध्येच भारी फोटो कसे काढाल? 'या' सोप्या टीप्स करा फॉलो

**आजकाल आपण कुठेही फिरायला गेलो तर तिथे सर्वात जास्त कोणतं काम करत असू तर ते फोटोग्राफी. म्हणजे प्रत्येक गोष्टीचे फोटो काढून ते सोशल मीडियावर आपण अपलोड करतच असतो. त्यात आता ते दिवस गेले जेव्हा लोक त्यांच्या आठवणी टिपण्यासाठी अर्थात फोटो काढण्यासठी मोठमोठे कॅमेरे वापरत होते. आता यासाठी बहुतेक जण मोबाईल फोनच वापरतात. तसेच, स्मार्टफोन कॅमेरे देखील दिवसेंदिवस सुधारत असताना, त्यापैकी बरेच जण जवळजवळ डीएसएलआरसारखे फोटो देतात.तर आज आम्ही तुम्हाला मोबाईल फोटोग्राफीच्या अशाच काही टीप्स आणि युक्त्या सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही स्वस्त स्मार्टफोनमध्येही कॅमेऱ्यासारखे भारी फोटो काढू शकता.**

**स्मार्टफोनचा कॅमेरा कसा आहे ते आधी समजून घ्या**

स्मार्टफोन वापरून चांगले फोटो कॅप्चर करण्यासाठी सर्वात आधी तुम्हाला तुमच्या फोनचा कॅमेरा कसा आहे म्हणजेच त्याची क्षमता किती आहे ते जाणून घेणं गरजेचं आहे. कारण फोनचं कॅमेरा सेटअप जसं असेल त्यानुसारच फोटो येणार आहेत. पण आम्ही सांगणाऱ्या टीप्समुळे तुम्ही तुमच्या फोनच्या कॅमेऱ्याचा पुरेपुर वापर करून फोटो क्लिक करू शकता. आजकाल बहुतेक आधुनिक फोन अनेक लेन्स सेटअपसह येतात जे वापरकर्त्यांना अल्ट्रा-वाइड अँगल लेन्स, टेलीफोटो लेन्स, डेडिकेटेड पोर्ट्रेट लेन्स, मॅक्रो लेन्स हे सर्व ऑफर करतात. या सर्वांच्या मदतीने तर फोटोज आणखीच भारी येतात.

**फोटो काढताना फ्रेमवर खास लक्ष द्या**

तुम्ही कोणत्याही वस्तूचा किंवा व्यक्तीचा फोटो घेत असाल तर तो पूर्णपणे फ्रेममध्ये योग्यरीत्या असेल हे लक्षात ठेवा. म्हणजेच ऑब्जेक्ट फ्रेममध्ये चांगला आला पाहिजे आणि अंतरही अधिक नसावं. तसंच कॅमेऱ्याची उंची योग्यरीत्या सेट करून परफेक्ट फ्रेममध्ये फोटो काढावा.

**तुमची लेन्स स्वच्छ करा**

ही एक अत्यंत सोपी ट्रिक असली तरी नक्कीच प्रभावी अशी ट्रिक आहे. कारण स्मार्टफोनच्या कॅमेरा लेन्स दिसतात, त्याहूनही अधिक घाण असतात. त्यामुळे त्या पूर्णपणे स्वच्छ केल्याने तुम्हाला चांगले आणि डिटेल्ड फोटो मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे फोटो काढण्यापूर्वी स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याची लेन्स नीट साफ करावी. कायमच लेन्सची काळजी घेणं फायद्याचं आहे.

**दोन्ही हात वापरा**

चांगला फोटो काढण्यासाठी नेहमी दोन हात वापरा, जेणेकरून तुमची फोनवरील पकड चांगली होईल आणि तुम्ही ऑब्जेक्ट आरामात कॅप्चर करू शकता. फोनवरील पकड चांगली असल्याने फोटो घेताना फोन हलणार नाही, ज्यामुळे फोटोही ब्लर किंवा चुकीच्या अँगल, फ्रेममध्ये येणार नाही. त्यामुळे दोन्ही हातांचा वापर करून फोटो काढणे, ही एक भारी ट्रिक आहे.

**अतिरिक्त प्रॉडक्ट्स वापरा**

डीएसएलआर कॅमेऱ्यांप्रमाणे, फोनसाठीही अतिरिक्त प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. जसं की, ट्रायपॉड, रिंग लाइट आणि अतिरिक्त लेन्स अशा विविध प्रॉडक्ट्सचा शक्य असल्यास वापर करावा. या सर्व उपकरणांच्या मदतीने फोटो अधिक भारी येतील. ट्रायपॉडने फोटो स्थिर येतील. रिंग लाईट प्रकाश ॲडजेस्ट करेल.



**झूमचा योग्य वापर**

फोटो घेण्यासाठी झूम या फीचरचा वापर योग्यरीत्या आणि जपून वापरा. कारण अधिक झूम केल्याने फोटोची क्लीॲरिटी खराब होते. त्यामुळे आवश्यक आणि शक्य असल्यास फोटो घेत असलेल्या ऑब्जेक्टच्या जवळ जा. अधिक झूममुळे फोटोचे रिझोल्युशन खराब होऊ लागते आणि स्वस्त फोनमध्ये डिजिटल झूम फारसे चांगले नसते. तसेच स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असलेले वेगवेगळे मोड वापरा जेणेकरून फोटो अधिक चांगले येतील. मोबाईल फोनमध्ये पोर्ट्रेट, नाईट, प्रो आणि स्लो-मो असे अनेक पर्याय आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही चांगला फोटो काढू शकता.

**योग्य फोकसही महत्त्वाचा**

फ्रेमिंग ही देखील महत्त्वाची गोष्ट आहे. हे आम्ही वरच सांगितलं. फोटो काढताना ऑब्जेक्टला योग्य ठिकाणी ठेवणं महत्त्वाचं आहे. तसंच फोकसही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कारण फोटो काढताना फोकस योग्यरीत्या केल्यावर ऑब्जेक्टचा फोटो अधिक भारी आणि क्लीअर येईल. फ्रेममधून अनावश्यक वस्तू काढून टाकण्यासह फोकसिंग ही एक अत्यंत उपयोगी टीप आहे.

**एचडीआर मोडचा वापर**

हाय डायनॅमिक रेंज म्हणजेच एचडीआर या मोडच्या मदतीने तुम्ही भारी भारी दर्जाचे फोटो क्लिक करू शकता. म्हणजेच तुम्ही एखादा मोठा फोटो क्लिक करत असाल तर अशा वेळी तुम्ही एचडीआर वापरू शकता. यासह, तुम्हाला तुमच्या फोटोमध्ये बरेच तपशील पाहायला मिळतील. एचडीआर एकाधिक एक्सपोजर कॅप्चर करते आणि फोटोच्या प्रकाश आणि गडद भागांमध्ये चांगले संतुलन राखते. एचडीआरमध्ये पार्क, इमारत, मंदिर किंवा मोठ्या वस्तूचा फोटो क्लिक करणे एक चांगला पर्याय आहे.

### मुंबईत पदपथ आणि इमारतीच्या गच्चीवर जाहिरात फलक लावण्यास मनाई

# मुंबईत पालिकेचे सुधारित धोरण जारी

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

घाटकोपर येथे १३ में २०२४ मध्ये पेट्रोल पंपाच्या ठिकाणी १२०:१२० फूट आकाराचे होर्डिंग कोसळून १४ जण मृत्युमुखी पडले होते, तर ७४ जण जखमी झाले होते. या दुर्घटनेचे पडसाद सर्वत्र उमटल्यानंतर न्यायालयाने रेल्वे प्राधिकरण आणि मुंबई महापालिका प्रशासन यांना फटकारले होते. तसेच पालिकेला जाहिरात होर्डिंगबाबत नवीन आणि सुधारित धोरण बनविण्यास सांगितले होते. त्यानुसार, मुंबई महापालिकेने, सुधारित जाहिरात धोरण, मार्गदर्शक तत्वे आजपासून (२७ नोव्हेंबर) जारी केली आहेत.



मुंबई महापालिका प्रशासनाने मुंबईत पदपथ आणि इमारतीच्या गच्चीवर जाहिरात प्रदर्शित करण्यास मनाई केली आहे. तसेच, 4040 फूट आकारापेक्षा जास्त आकाराच्या होर्डिंग्ज लावण्यास मनाई करण्यात आली आहे. एकेरी व पाठपोट फलकांसोबतच ह्यव्हीह्ल व ह्यएलह्ल आकार तसेच त्रिकोणी, चौकोनी, पंचकोनी, षटकोनी स्वरुपाच्या जाहिरात फलकांना परवानगी देण्यात आली आहे. मुंबई महापालिका हद्दीतील जाहिरातींचे नियमन करण्याच्या अनुषंगाने मुंबई महापालिकेकडून ह्यजाहिरातीची मार्गदर्शक तत्त्वे-२०२५' (पॉलिसी गाईडलाइन्स फॉर डिस्प्ले ऑफ आऊटडोअर ॲडव्हर्टाइजमेंट) जाहीर करण्यात आली आहेत. २७ नोव्हेंबर २०२५ पासून ही मार्गदर्शक तत्त्वे मुंबई



महापालिकेच्या https://www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहेत. जाहिरातदार, जाहिरात संस्था तसेच संबंधित सर्व घटकांनी या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

वास्तविक, मुंबई महापालिकेने यापूर्वी जाहीर केलेल्या 'जाहिरातीची मार्गदर्शक तत्त्वे- २००८' मध्ये सुधारणा करत २०२५ मध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये काही नवीन बाबींचा समावेश केला आहे. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, मुंबई क्षेत्रात ४०:४० फुटांपेक्षा जास्त आकारमानाच्या जाहिरात फलकास परवानगी दिली जाणार नाही. पदपथ तसेच इमारतीच्या गच्चीवर जाहिरात प्रदर्शित करण्यास नव्याने परवानगी दिली जाणार नाही. डिजिटल जाहिरात फलकांची प्रकाशमानता (ल्यूमिनन्स रेशिओ) ३:१ या गुणोत्तरापेक्षा अधिक ठेवता येणार नाही. तसेच, लुकलुकणाऱ्या (फ्लिकरिंग) जाहिरात प्रदर्शित करण्यास परवानगी नसेल. मॉल्स, मल्टिप्लेक्सेस, व्यापारी संकुल (शॉपिंग कॉम्प्लेक्स), वाणिज्यिक इमारती (कमर्शिअल बिल्डिंग), पेट्रोल पंप येथे एलईडी जाहिरात प्रदर्शित करता येईल. तसेच, बांधकाम सुरू असलेल्या व दुरुस्तीची कामे सुरू असलेल्या इमारतींच्या कुंपणावर तसेच इमारतीच्या बाह्यभागावर व्यावसायिक व अव्यावसायिक जाहिराती प्रदर्शित करता येतील.

दरम्यान, मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रथमच एकेरी (सिंगल) व पाठपोट (बॅक टू बॅक) फलकांसोबतच ह्यव्हीह्ल व ह्यएलह्ल आकार तसेच त्रिकोणी (ट्राय व्हिजन), चौकोनी (स्केअर व्हिजन), पंचकोनी (पेंटागॉन व्हिजन), षटकोनी स्वरुपाच्या (हेक्झागॉन व्हिजन) जाहिरात फलकांना यापुढे परवानगी देण्यात येईल. याकरीता वाहतूक पोलीसांची ह्यना हरकतह्ल लागेल. मुंबई महापालिकेच्या अनुज्ञापन खात्यामार्फत जाहिरातींना परवानगी देणे तसेच अनधिकृत जाहिरातींविरोधात कारवाई करण्याची कार्यवाही केले जाते.

मुंबई महापालिका अधिनियम 1888 च्या कलम ३२८/३२८ अ अंतर्गत, मुंबई महापालिकेच्या हद्दीतील जाहिरातींचे नियमन केले जाते. या पार्श्वभूमीवर, माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या समितीने सुचविलेल्या शिफारसी तसेच नागरिकांच्या हरकती व सूचना विचारात घेऊन 'जाहिरातीची मार्गदर्शक तत्त्वे-२०२५' जाहीर करण्यात आली आहेत. ही मार्गदर्शक तत्त्वे सविस्तर स्वरुपात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर २७ नोव्हेंबर २०२५ पासून उपलब्ध करण्यात आली आहेत, असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

### मजुरांच्या मुळावर स्थलांतराचा भस्मासुर

## व्यवस्थेच्या हलगर्जीपणामुळे दूरगामी परिणाम



■मोखाडा। प्रतिनिधी,

स्थानिक पातळीवर रोजगार मिळावा आणि स्थलांतर थांबावे, या उद्देशाने रोजगार हमी कायदा केंद्र व राज्य शासनाने पारित केला असला, तरी स्थानिक प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसल्याची बाब वेळोवेळी समोर आली आहे. यंत्रणांची चालढकल आणि नरेगाच्या अकुशल पगाराबाबत केंद्र शासनाने दाखवलेले कमालीचे औदासिन्य यामुळे बाजारपेठेत मंदीचे वातावरण दिसून येत आहे. स्थानिक ठिकाणीच रोजगार मिळाला तरी पगाराची होत असलेली ओढाताण मजुरांच्या स्थलांतरावर आणि पयार्याने त्यांच्या जीवनमानावर दूरगामी परिणाम करत आहे.

१९७७-७८ मध्ये या योजनेचे कायद्यात रूपांतर करण्यात आले. या कायद्याच्या धर्तीवर २००५ मध्ये रोजगार हमी कायदा लागू करून या कायद्यातील तरतुदी आणि महाराष्ट्राच्या मूळ रोहयोतील तरतुदींचे एकत्रीकरण करून देशातील सर्व राज्यामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) कार्यान्वित करण्यात आली. मुळ योजनेचे उदात्तीकरण झाले असले, तरी परिस्थितीत काडीमात्र फरक पडलेला नाही. त्यामुळं होती तीच योजना बरी होती, त्यावेळी घामाचा दाम प्रत्यक्ष हातात येत होता. आत्ता डीबीटीमुळे तर ४-४ महिने पगाराची प्रतीक्षा करावी लागत असल्याची वस्तूनिष्ठ शोकांतिका अनुभवायला मिळत आहे.

यंत्रणांची कामचलाऊ वृत्ती आणि पगाराची हेळसांड यामुळे महत्वाकांक्षी योजनेला बासनात गुंडाळून ठेवण्याचे काम झाले असून आदिवासींची रोजगाराअभावी होणारी फरपट थांबलेली नाही. या योजनेत मागेल त्याला काम मिळत असले, तरी १५ दिवसात दाम मिळेलच याची अनुभवसिद्ध शाश्वती नसल्याने स्थानिक मजुरांचा ओढा स्थलांतराकडे वाढलेला आहे.

घरी फक्त म्हातारी माणसं ठेवून बालबच्चे व कुटुंब कबील्यासह होणे आणि त्यायोगे अनेक हालअपेष्टांना सामोरे जावे लागणे ही बाब येथील मजूरांना नित्याची व सवयीची झालेली आहे.

शासनाने महात्मा गांधी रोजगार हमी योजना २००५ पासून सुरू केली असून त्यात कालौघात हवे ते बदल झाले, तरी मजुरांची परिस्थिती आजही तशीच आहे. रोहयो मजुरांच्या मागणीनुसार वर्षभरात शासनाने मजुरांना मागेल तितके काम देणे बंधनकारक केले आहे. असे असतानाही स्थलांतर होतेच कसे यावर कोणत्याही स्तरावरून समीक्षा केली जात नाही, हेच मजुरांचे दुर्दैव आहे.

**स्थलांतराचा फटका मुलांच्या शिक्षणावर**

तालुक्यातील मजूर वीटभट्टी, इमारत बांधकाम, रेती काढणे यासारख्या मिळेल त्या कामाच्या शोधात कुटुंबासह फिरत जगण्याचा संघर्ष करीत राहतात. मात्र रोजगाराच्या या भटकंतीमुळेच जव्हार, मोखाडा, विक्रमगड अशा तालुक्यात आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. वषार्तील ७ ते ८ महिने रोजगारासाठी स्थलांतरित व्हावे, लागल्याने मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, गरोदर मातांचे आरोग्य आणि कुपोषणामुळे मृत्यूचे प्रमाण देखील या भागातच जास्त पहावयास मिळते.

**आणखी किती 'अविनाश'चा बळी घेणार.. ?**

सन २००८-९ मध्ये बोट्याचीवाडी येथील रोजगाराच्या शोधात स्थलांतरित कुटुंबाला आपल्या अवघ्या आठ महिन्याच्या 'अविनाश'ला गरजेपोटी ८०० रुपयांना विकण्याची नामुष्की बरफ कुटुंबावर ओढवली होती. त्याशिवाय भाऊ सोमा गवारी या मजुरालाही आपला जीव गमवावा लागला. तसेच वेठबिगारीच्या घटनाही असंख्य प्रमाणात घडतात. स्थलांतरामुळे दोन प्रदेश आणि त्यामध्ये राहणाऱ्या लोकांच्या जीवनशैलीत असंतुलन निर्माण होते. लोकसंख्येच्या घनतेवर मोठा परिणाम होतो. लोकप्रतिनिधींसह एकूणच व्यवस्थेवर या विपरीत परिस्थितीचा यत्किंचितही परिणाम होत नाही.

**'नाका कामगार' म्हणून स्थलांतरित**

भिवंडी, ठाणे, कल्याण, पालघर, मुंब्रा या ठिकाणी गवत कापणे, बांधकाम, रेतीबंदर, अगदी बीड, उस्मानाबाद अशा लांबच्या जिल्ह्यात मिळेल ते काम करण्यासाठी तसेच 'नाका कामगार' म्हणूनही हे मजूर स्थलांतरित होत आहेत. हे करत असताना बऱ्याच वेळा या आदिवासी मजुरांवर अन्याय सुद्धा होतो. जॉबकार्ड धारक रोहयो मजुरांना ग्रामपंचायत स्तर, पंचायत समिती, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, तालुका कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, वनविभाग, पाणलोट क्षेत्र, वनीकरण अशा यंत्रणांमधून काम देण्यात येते. मात्र तरीही मजुराला रोजगार हमीवर वर्षभर काम मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

## कुडाळ-सावंतवाडीमध्ये पावसाच्या सरी... आंबा-काजू पिकांवर परिणाम होण्याची शक्यता...!

**बागायतदारांच्या खर्चात भर**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या थंडीमुळे काजूच्या कलमांना चांगली पालवी फुटली होती. आंब्याच्या झाडांवर मोहोर फुटण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र आता सतत ढगाळ वातावरण राहिल्यास किंवा पुढील काही दिवसांत पाऊस सुरू राहिल्यास कीड-रोगांवर नियंत्रणासाठी फवारणी करण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे बागायतदारांच्या खर्चात भर पडण्याची शक्यता आहे.

■सिंधुदुर्ग। प्रतिनिधी,

जिल्ह्यातील सावंतवाडी आणि कुडाळ तालुक्याच्या बहुतेक भागात अचानक पावसाच्या सरी कोसळल्या. अनपेक्षित आलेल्या या पावसामुळे शेतकरी आणि बागायतदारांची एकच तारांबळ उडाली. गेल्या दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते. उष्म्यात झालेल्या वाढीमुळे पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवली जात होती. जिल्ह्यातील इतर भागातदेखील दिवसभर काळे ढग दाटून आल्याने केव्हाही पाऊस कोसळेल या शक्यतेमुळे शेतकरी आणि बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.



गेल्या आठवडाभरापासून पडणाऱ्या थंडीमुळे आंबा आणि काजू बागायतदार सुखावले होते. फळधारणा आणि फुलोरा प्रक्रियेसाठी अनुकूल वातावरण मिळत असल्याने चांगली अपेक्षा होती. मात्र रविवारपासून वातावरणात अचानक बदल होऊ लागला. दुपारी पडलेल्या पावसाने शेतकऱ्यांची धांदल उडाली. सध्या अनेक शेतकरी भात कापणीच्या शेवटच्या टप्प्यात आहेत. तर बागायतदारांनी आंबा-काजू बागांची सफाई आणि देखभाल सुरू केली आहे. अशातच आलेल्या पावसामुळे आणि निर्माण झालेल्या ढगाळ वातावरणामुळे या फळपिकांवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः या दिवसांत आंबा-काजू झाडांवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती बागायतदारांना सतावत आहे.

एकूणच, यंदाच्या हंगामात आंबा आणि काजू पिकांबाबत अनिश्चितता निर्माण झाली असून आगामी हवामानावरच उत्पादनाची स्थिती अवलंबून राहणार असल्याचे शेतकरी-बागायतदारांचे म्हणणे आहे.

## आता सेकंड क्लासचा प्रवास होणार गारेगार! मुंबई उपनगरीय रेल्वेच्या ताफ्यात लवकरच सर्व लोकल एसी होणार

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईकरांना दजेर्दार वाहतूक सुविधा देण्यासाठी मेट्रोचे जाळे विस्तारले जात आहे. तर दुसरीकडे मुंबई उपनगरीय लोकलचा प्रवास गारेगार व्हावा यासाठी स्वयंचलित बंद होणारे मेट्रोचे कोच जोडले जाणार आहेत. विशेष म्हणजे मुंबई उपनगरीय लोकल एसी झाल्या, तरी सेकंड क्लासच्या तिकिट दरात कोणतीही वाढ करण्यात येणार नाही, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच वरळी ते बीकेसी टनेल तयार करण्यात येत असून ते सांताक्रूझ येथील डोमेस्टिक विमानतळाला हे टनेल जोडले जाणार आहे. यामुळे साऊथ मुंबई वरुन डोमेस्टिक विमानतळापर्यंत २० मिनिटांत प्रवास होणार आहे. मुंबईला टनेलच्या नेटवर्कशी जोडले जाणार आहे. तसेच नवी मुंबई विमानतळ हे भारतातील पहिले विमानतळ ठरणार असून तेथून गेट वे ऑफ इंडियापर्यत वॉटर टॅक्सीने प्रवास करणे शक्य होणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वरळी येथील डोम मध्ये आयोजित 'आयआयएमयूएन' कार्यक्रमात ते बोलत होते. "अटल सेतू, कोस्टल रोड, मेट्रोचे जाळे विस्तारले जाणार याविषयी बोलायचो तेव्हा विरोधक



ट्रोल करत होते, विधानसभेतही चेष्टा करायचे. परंतु मुंबईचा विकास झपाट्याने होत असून मुंबईचा आताचा विकास हा ट्रेलर आहे. पुढील पाच ते सात वर्षात मुंबईचा चेहरामोहरा बदलणार आहे," असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. "सध्या ६० टक्के मुंबईकर वेस्टर्न एक्स्प्रेस-वेचा वापर करतात. वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवरील वाहतूककोंडी फोडण्यासाठी कोस्टल रोड वरळी ते अटल सेतू असा थेट प्रवास करण्यासाठी उड्डाणपूल बांधण्यात येत असून तो वर्षभरात पूर्ण होईल. दरवर्षी ५० किमीचे मेट्रोचे जाळे निर्माण केले जाणार असून यामुळे मुंबईत कुठूनही कुठे जाणे शक्य होणार आहे," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

"मुंबई वन ॲप तयार केले असून एकाच तिकिटावर रेल्वे, मेट्रो, बेस्ट बस व मोनोचा प्रवास करता येणार आहे. रो-रो सर्विस अलिबागपर्यंत आहे. परंतु आता वॉटर ट्रान्सपोर्ट तयार करण्यात येत आहे. यातील प्रत्येक गोष्ट फक्त कागदावर नसून प्रत्यक्ष अंमलबजावणी स्तरावर आहे," असेही ते म्हणाले.

**तिकिटाच्या किमतीत बदल नाही**

आम्ही मुंबई लोकलचे सगळे डबे वातानुकूलित होणार असले तरी द्वितीय श्रेणीचे तिकीट एक रुपयानेही वाढवण्यात येणार नाही. सध्याच्या तिकीट दरानेच आम्ही मुंबईकरांना वातानुकूलित ट्रेनचे तिकीट देणार आहोत. मुंबईकरांचा रोजचा प्रवास अधिक सुखकर आणि आरामदायक होण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नातून मुंबई शहरी परिवहन प्रकल्पाच्या माध्यमातून ही सुधारणा करण्यात येणार आहे. जगातील सर्वाधिक गर्दीच्या उपनगरीय रेल्वे प्रणालीपैकी एक असलेल्या मुंबई लोकलचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला जाणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## तलावात पडून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू

■विरार। प्रतिनिधी,

विरारच्या फुलपाडा परिसरातील खाडग्या तलावात पडून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी सायंकाळी घडली आहे. सार्थक मोरे असे मृत मुलाचे नाव असून तो खेळण्यासाठी तलावाजवळ गेला होता. खेळत असताना तोल जाऊन तो पाण्यात पडल्याने त्याचा मृत्यू झाला. या तलावाचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू असून संरक्षणासाठी असलेली जाळी नव्याने बसविण्यात येत होती. हे काम ठेकेदार आशुतोष झा या ठेकेदाराकडे देण्यात आले होते. मात्र जाळीचे काम अपूर्ण असून जागेवर कोणतेही बॅरिकेड, सूचना फलक किंवा सुरक्षा उपाय नसल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळेच हा प्रकार घडल्याचा दावा परिसरातील नागरिकांनी केला आहे. तसेच सुरक्षा रक्षक नसल्याने मुलांना निबंर्धाशिवाय तलावाजवळ जाणे शक्य होत असल्यामुळे ही दुर्घटना घडली आहे. गेल्या काही महिन्यांपासून वसई विरार महानगर पालिकेच्या तलावांमध्ये बुडून मृत्यूंच्या घटना वाढत आहेत. पालिकेने सुरक्षेची उपाययोजना न केल्याचा आरोप नागरिकांनी केला जात आहे. निष्पाप जीव जात असताना प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### वसई क्लोरीन गॅस गळतीप्रकरणी मनपा दोषी

## भुपेश कडुलकर यांच्या तत्परतेमुळे जीवितहानी टळली

■वसई। प्रतिनिधी,

वसई पश्चिमेतील सनसिटी टाकीजवळ ठेवलेल्या जुन्या क्लोरीन सिलिंडरमधून अचानक गॅसची गळती सुरू झाल्याने मंगळवारी घडलेल्या दुर्घटनेत सुमारे १२ जण बाधित झाले आणि एकाचा मृत्यू झाला. घटनास्थळी तत्काळ दाखल झालेल्या आगरी कोळी सेनेचे जिल्हाध्यक्ष भुपेश कडुलकर यांनी धाडसाने आणि तत्परतेने परिस्थिती हाताळल्यामुळे मोठा अनर्थ टळला. यावेळी अग्निशमन विभागाकडे मूलभूत ऑक्सिजन किटची कमतरता असल्याचा आरोप करत या दुर्घटनेला मनपा दोषी असल्याचे कडुलकर यांनी म्हटले. कडुलकर यांनी घटनास्थळी मास्क घालून गॅसचा प्रसार जास्त असलेल्या भागात जाऊन नागरिकांना घरात राहण्याचे आवाहन केले आणि सुरक्षित ठिकाणी जाण्याच्या सूचना दिल्या. काही नागरिक बाहेर आल्याने ते बाधित झाले, मात्र कडुलकर यांनी तत्काळ पोलीस व अग्निशमन दलाला कॉल करून परिस्थितीची माहिती दिली आणि दोन्ही यंत्रणा तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. कडुलकर यांनी अग्निशमन विभागाकडे मूलभूत



ऑक्सिजन किटची कमतरता असल्याचा आरोप केला. 'जीव धोक्यात घालून काम करणारे जवान जर सुरक्षित नसतील, तर ही मनपाची मोठी चूक आहे,' असे त्यांनी म्हटले. पोलिसांच्या माहितीनुसार, देव पार्डीकर (५९) यांचा मृत्यू झाला आहे. वसई पेटिट रुग्णालयात अनिश सोलंकी (१५), देवांग शहा (४६), शांता सोलंकी (६२), अंजली राठोड (१९) आणि प्रिया राठोड (१४) यांना दाखल करण्यात आले असून ते स्थिर आहेत. तर अनिल पाटील (३५) आणि योगेश पाटील (३५) यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना बंगली रुग्णालयात हलवण्यात आले आहे. कडुलकर यांनी ही दुर्घटना टाळण्यासाठी क्लोरीन सिलिंडरला सनसिटी परिसरातील पाण्यात टाकून विल्हेवाट लावली गेल्याचे सांगितले.

### सुरक्षा रक्षकाच्या पॅन कार्डचा गैरवापर

## २.२० कोटींचा केला व्यवसाय... आयकराचा बोजा मूळ पीडितावर

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबई येथे एक अत्यंत धक्कादायक फसवणुकीचे प्रकरण उघडकीस आले आहे. या प्रकरणात, एका अज्ञात व्यक्तीने एका सुरक्षा रक्षकाच्या पॅन कार्डचा गैरवापर करून एक बनावट व्यावसायिक फर्म स्थापन केली. या फर्ममार्फत कोट्यवधी रुपयांचे व्यवहार करण्यात आले आहेत, ज्यामुळे आता मूळ पॅन कार्डधारक असलेल्या सुरक्षा रक्षकाला आयकर विभागाने सुमारे सव्वा दोन कोटी रुपयांच्या व्यावसायिक उलाढालीवर कर भरण्याची नोटीस पाठवली आहे.

तक्रारदार हे नवी मुंबईमध्ये राहतात, ते एका शिपिंग कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणून काम करतात, त्यांना एप्रिल २०२५ मध्ये पहिल्यांदा आयकर विभागाकडून नोटीस मिळाली. या नोटीसमध्ये नमूद केले होते की, त्यांच्या पॅन कार्डचा वापर करून एका ट्रेडिंग कंपनीने आयातीचा व्यवसाय केला आहे आणि त्यांनी आर्थिक वर्ष २०२०-२०२१





आणि २०२१-२०२२ चा आयकर भरलेला नाही. सुरुवातीला तक्रारदारांनी ही नोटीस खोटी समजून त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र, जुलै २०२५ मध्ये दुसरी नोटीस आल्यानंतर त्यांच्या पत्नीने एका चार्टर्ड अकाउंटंटसोबत संपर्क साधला, त्यानंतर ही नोटीस खरी असल्याची पुष्टी झाली.

यानंतर तक्रारदार आणि त्यांच्या पत्नीने लालबाग-दादर येथील आयकर कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांची भेट घेतली. अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की नोटीस योग्य आहे आणि एका ट्रेडिंग कंपनीमार्फत झालेल्या २, २०, ३६, ४३६ कोटी रुपये एवढ्या मोठ्या व्यवहारांवर लागलेला आयकर त्यांनाच भरावा लागेल. आयकर अधिकाऱ्यांनी त्यांना स्पष्ट केले की, त्यांच्या मूळ पॅन कार्डाचा क्रमांक आणि ट्रेडिंग कंपनी चालवणाऱ्या व्यक्तीने वापरलेल्या पॅन काडार्चा क्रमांक जरी सारखा असला तरी, त्यावरील फोटो आणि स्वाक्षरी मात्र वेगवेगळे आहेत. तक्रारदारांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, २०१९ ते २०२२ या काळात त्यांच्या पॅन कार्डचा गैरवापर करून ही कंपनी स्थापन करण्यात आली आणि त्यांच्या नावावर एक जीएसटी क्रमांक देखील तयार करण्यात आला. आता, सुरक्षा रक्षकाने त्यांच्या पॅन कार्डचा गैरवापर करणाऱ्या आणि कोट्यवधी रुपयांच्या व्यावसायिक व्यवहाराचा कर भरण्यास भाग पाडणाऱ्या त्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध अखेर एफआयआर दाखल केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००० १४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com